cmyk

## संपादकीय

### मान्सूनचा विराम आणि वाढती चिंता...

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी जून महिना म्हणजे आशेचा महिना. वर्षभराच्या आर्थिक गणिताचा पाया असलेल्या खरीप हंगामाची सुरुवात मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. यंदा नैऋत्य मोसमी वारे नियोजित वेळेत कोकणात दाखल झाल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र मान्सूनच्या पुढील प्रवासाला अचानक ब्रेक लागण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने ही आशा आता चिंतेत बदलली आहे.


दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–८२ | शुक्रवार दि.१२ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### नीती आयोगाचा भर रोजगार, कौशल्यविकासावर

दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलची ११ वी बैठक पार पडली. या बैठकीत रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास, मानवी विकास, आरोग्य, उद्योजकता आणि राज्यांच्या सर्वांगीण विकासावर सखोल चर्चा करण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये विकासाचा समन्वय साधत 'विकसित भारत २०४७'च्या आराखड्याला गती देणे हा या बैठकीचा मुख्य उद्देश असणार आहे. राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक, केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले. देशातील तरुणांची वाढती संख्या, बदलणारे तंत्रज्ञान आणि जागतिक स्पर्धा लक्षात घेता रोजगारनिर्मिती हा बैठकीतील सर्वात महत्त्वाचा विषय मानला जात आहे. भविष्यातील रोजगारांच्या गरजा लक्षात घेऊन कौशल्यविकासाच्या नव्या धोरणांवर चर्चा करण्यात आली.

### इथेनॉल मिश्रित पेट्रोलवरील उत्पादन शुल्क रद्द

दिल्ली: केंद्र सरकारने २२% ते ३०% इथेनॉल मिश्रण असलेल्या पेट्रोलला उत्पादन शुल्कातून पूर्णपणे सूट दिली आहे. देशात इथेनॉलचा वापर वाढवणे आणि आयातीवरील कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करणे, हा या निर्णयाचा मुख्य उद्देश आहे. सध्याच्या २० इंधनाच्या मर्यादेपलीकडे जाऊन कर सवलत देणारा हा एक मोठा निर्णय आहे. पर्यायी इंधनाचा वापर वाढवण्यासाठी आणि कच्च्या तेलाची आयात कमी करण्यासाठी सरकारने घेतलेल्या या निर्णयामुळे देशातील हरित इंधन मोहिमेला मोठा कर दिलासा मिळाला आहे. जारी करण्यात आलेल्या सरकारी अधिसूचनेनुसार, पेट्रोलमध्ये २२% ते ३०% इथेनॉलचे मिश्रण असेल, त्यावर आता कोणतेही उत्पादन शुल्क आकारले जाणार नाही. भारत हा जगातील तिसरा सर्वात मोठा तेल आयातदार आणि ग्राहक देश आहे. देशाच्या ऊर्जा सुरक्षा धोरणाचा एक भाग म्हणून पेट्रोलमध्ये इथेनॉलचे प्रमाण वाढवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे.

### अभिषेकला दूर करण्यासाठी ज्येष्ठ नेत्याचा अल्टिमेटम

कोलकाता: अभिषेक बॅनर्जी हे अत्यंत उद्धट आणि गर्विष्ठ आहेत. ते ज्येष्ठ नेत्यांचा आदर करत नाहीत, त्यांचा माझ्यावर कधीच विश्वास नव्हता आणि त्यांच्यामुळेच पक्ष रसातळाला चालला आहे, असा गंभीर आरोप करत आता तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्षा ममता बॅनर्जी यांनी आमच्यात आणि अभिषेक बॅनर्जींमध्ये एकाची निवड करावी, असा थेट अल्टिमेटमच पक्षाचे ज्येष्ठ नेते कल्याण बॅनर्जी यांनी दिला आहे. तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी गुरूवारी पक्षाचे सरचिटणीस अभिषेक बॅनर्जी यांच्यावर घणाघाती टीका केली. स्वाक्षरी फेरफार प्रकरण आणि त्याशी संबंधित सीआयडी झडती प्रकरणातून ममता बॅनर्जींच्या पुतण्याने (अभिषेक बॅनर्जी) आपल्याला शेवटच्या क्षणी वकील पदावरून हटवल्याचा आरोप कल्याण बॅनर्जी यांनी केला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.११ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ६१.०० क्विंटल | २,००० | २,४५० | २,३०३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९१.५० क्विंटल | २,२०० | ४,५३५ | २,८८२ |
| मका/लोकल: १.५० क्विंटल | २,००१ | २,००१ | २,००१ |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ८६.०० क्विंटल | २,०५० | २,६४१ | २,२८६ |
| मुग: २.०० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ५,२०१ | ५,५०१ | ५,३९८ |

# शेतकरीराजा चिंतेत..!

## मान्सूनच्या विलंबामुळे पेरण्या खोळंबल्या

पुणे । प्रतिनिधी

**राज्यात मान्सूनचे आगमन अपेक्षेपेक्षा लांबणीवर पडल्याने शेतकरीराजा चिंतेत सापडला आहे. जून महिन्याचा दुसरा आठवडा संपत आला असतानाही राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नाही. परिणामी खरीप हंगामातील पेरण्यांचे नियोजन विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांनी शेतजमिनींची मशागत, बियाणे व खतांची खरेदी यांसाठी मोठा खर्च केला असला तरी आकाशाकडे डोळे लावून बसण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.**



भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार, देशाच्या ईशान्येकडील भागांसह पश्चिम बंगालमधील काही प्रदेशांमध्ये मान्सूनची प्रगती झाली आहे. मात्र महाराष्ट्रात मागील दोन दिवसांपासून मान्सूनची उत्तर सीमा सोलापूर आणि कोकणातील हर्णे परिसरात स्थिरावली आहे. त्यामुळे मान्सूनची वाटचाल संथ झाली असून राज्यातील उर्वरित भागात पावसाचे आगमन आणखी काही दिवस लांबण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सध्या दक्षिण कोकणातील सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये तसेच मध्य महाराष्ट्रातील काही भागांत तुरळक पाऊस पडत आहे. मात्र मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील बहुतांश भाग अजूनही दमट उकाड्याचा सामना करत आहेत. पावसाअभावी शेतजमिनी कोरड्या असून पेरणीसाठी आवश्यक ओलावा निर्माण झालेला नाही. खरीप हंगाम हा महाराष्ट्राच्या कृषी अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. सोयाबीन, कापूस, तूर, मका, भात आणि विविध कडधान्यांची लागवड मोठ्या प्रमाणावर याच काळात केली जाते. वेळेत पाऊस न झाल्यास पेरण्या उशिरा होतात आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो.

▶▶ पान २ वर

# केरळमध्ये निपाहचा हाय अलर्ट..!



तिरूअनंतपूरम । वृत्तसंस्था

### कोझिकोडमधील रुग्णाची प्राथमिक चाचणी पॉझिटिव्ह

केरळमधील कोझिकोड येथील एका ४३ वर्षीय व्यक्तीमध्ये एन्सेफलायटीसची (मेंदूज्वर) लक्षणे दिसून आल्यानंतर त्याला कोझिकोड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या रुग्णाच्या शरीरातील द्रवाचे नमुने पुण्याच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ व्हायरोलॉजीकडे निपाहच्या तपासणीसाठी

▶▶ पान २ वर

# पक्षाच्या हिताला प्राधान्य देऊन कार्यकर्त्यांना संधी देणार

## अजितदादांप्रमाणे कडक निर्णय घेणार–सुनेत्रा पवार

मुंबई । प्रतिनिधी

२७ वर्षापूर्वी स्वाभिमानातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. अनेक दिग्गज नेत्यांचे कार्यकर्त्यांचे पक्षाच्या जडणघडणीत मोठं योगदान असल्याचे मत राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. आज पक्षाचा २७ वा वर्धापन दिन साजरा करताना भावनिक वातावरण आहे. आपल्या सर्वांचे नेते अजितदादा आपल्यात नाहीत. त्यांच्याशिवाय साजरा होणारा हा पहिलाच वर्धापन दिन असल्याचे पवार म्हणाल्या. अजित दादांना विकसीत महाराष्ट्र प्रेरीत होता, हे सांगताना सुनेत्रा पवार भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २७ वा वर्धापन दिन गुरुवारी मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडला. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी आणि

▶▶ पान २ वर

# देशात नरेंद्र राज्यात देवेंद्र पेपर फोडणारे धर्मेंद्र

## कॉकरोच जनता पार्टीचे पुण्यात आंदोलन, केल्या ५ मोठ्या मागण्या

पुणे । प्रतिनिधी

**वैद्यकीय प्रवेशासाठी झालेल्या नीट परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि सीबीएसई परीक्षांमधील गोंधळावरून देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संताप पाहायला मिळत आहे. या प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून तातडीने राजीनामा द्यावा, या मागणीसाठी पुण्यात कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने एक मोठे आणि लक्षवेधी आंदोलन करण्यात आले. त्यासोबत कॉकरोज जनता पार्टीच्या वतीने पाच मोठ्या मागण्या करण्यात आल्या. आंदोलनामध्ये देशात नरेंद राज्यात देवेंद्र नीट पेपर फोडणाने धर्मेंद्र असे फलक लक्ष वेधुन घेत होते.**




सोशल मीडिया आणि प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून तरुणांचा आवाज उठवणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीच्या या आंदोलनात प्रसिद्ध समाजसेवक सोनम वांगचूक आणि या चळवळीचे मुख्य समन्वयक अभिजित दीपके यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी हजेरी लावली होती. पुण्यात झालेल्या या आंदोलनात बहुसंख्येने तरुण आणि विद्यार्थी सहभागी झाले होते, तसेच ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला. या आंदोलनाच्या सुरुवातीला हैदराबाद विद्यापीठातील दिवंगत विद्यार्थी रोहित वेमुला याला सामूहिक

▶▶ पान २ वर



# लाडक्या बहिणींना दोन दिवसांत पैसे मिळणार

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यभरातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थी महिलांसाठी अत्यंत आनंदाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. मे महिन्याच्या हप्त्याची चातकासारखी वाट पाहणाऱ्या पात्र महिलांच्या खात्यात येत्या १२ ते १५ जून दरम्यान योजनेचे पैसे जमा केले जाणार आहेत.**

भाजप आमदार मोनिका राजळे यांनी सोशल मीडिया पोस्टच्या माध्यमातून ही महत्त्वाची आणि अधिकृत माहिती शेअर

▶▶ पान २ वर

# एसटी कर्मचाऱ्यांसाठी खुषखबर!

## महागाई भत्ता ५८ टक्क्यांवर, घरभाडे भत्ताही वाढवणार

ठाणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सुमारे ८६ हजार कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी मोठा दिलासादायक निर्णय घेत परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रतापराव सरनाईक यांनी एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे ५३ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत वाढविण्याची ऐतिहासिक घोषणा केली. यासोबतच कर्मचाऱ्यांचा घरभाडे भत्त्यात देखील वाढ करण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे.

मुंबई सेंट्रल येथील वाहतूक भवन या महामंडळाच्या मुख्यालयात आज राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत आयोजित करण्यात आलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही घोषणा करण्यात आली. यावेळी विविध कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी मांडलेल्या आर्थिक व प्रशासकीय मागण्यांवर




सकारात्मक आणि सविस्तर चर्चा झाली. बैठकीच्या प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरध्वनीद्वारे सर्व कर्मचारी संघटनांना शुभेच्छा देताना, "सामंजस्याची भूमिका घेऊन महामंडळ अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकत्र काम करावे," असे आवाहन केले. यावेळी मंत्री प्रताप सरनाईक यांनी आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेत, भविष्यात राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता लागू होताच तो तात्काळ प्रभावाने एसटी कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

▶▶ पान २ वर

# शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये विलीन होणार?



### रोहित पवारांचे सूचक वक्तव्य तर सुप्रिया सुळेंची सावध भुमिका

मुंबई । प्रतिनिधी

विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या राजकारणाला वेग आला असताना, सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांच्या भेटीनंतर तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेसच्या संभाव्य जवळीकीची चर्चा देशभर रंगली आहे. या पार्श्वभूमीवर सुप्रिया सुळे यांना भविष्यात नेशनलिस्ट कांग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) ला काँग्रेसमध्ये विलीन होण्याची ऑफर आल्यास भूमिका काय असेल, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी सावध पण महत्त्वपूर्ण प्रतिक्रिया दिली आहे.

अलीकडेच सोनिया गांधी आणि ममता बॅनर्जी यांच्यात दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर ममता बॅनर्जी आणि त्यांचे पुतणे अभिषेक बॅनर्जी यांनी काँग्रेस नेते राहुल गांधी यांचीही भेट घेतली. या बैठकींनंतर तृणमूल काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता व्यक्त केली जाऊ लागली. मात्र तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांनी अशा विलिनीकरणाच्या चर्चांना अधिकृत दुजोरा दिलेला नाही. उलट, दोन्ही पक्षांकडून या चर्चा फेटाळण्यात आले आहेत.

▶▶ पान २ वर

# वर्धापन दिन : मुंडे, भुजबळ, तटकरे, पटेल यांची टोलेबाजी

मुंबई –बीड । प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षाचा वर्धापन दिन गुरूवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मात्र व्यासपीठावर धनंजय मुंडे, छगन भुजबळ, सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल यांनी भाषणात तुफान फटकेबाजी केली. मुंडे यांच्या भाषणावर पटेलांनी काळजी करू नका, तुम्हाला पुन्हा खेळायला संधी आहे. तर भुजबळांनी तटकरेंकडे पाहत, राजकारणाचा खेळ करू नका, तटकरेंनी भुजबळ कबड्डीपटू असा उल्लेख करत एकमेकावर मार्मिक शब्द फेक केल्याने या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात चांगलीच रंगत आली.**






राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. झालेल्या पक्षांच्या पदाधिकारी, मंत्री, लोकप्रतिनिधी यांच्या मेळाव्यामध्ये चांगलीच मज्जा आली ती मुंडे, भुजबळ, पटेल, तटकरे यांच्या भाषणांनी. प्रारंभ धनंजय मुंडे यांनी आपल्या भाषणामध्ये मंत्रीपद नसल्याने बाजूला राहिल्याची खंत शब्दातून व्यक्त केली. खेळ खेळात की राजकारणात खेळ, मात्र प्रत्येक वेळी आम्ही बारावा खेळाडूच राहणार का. ज्या सूर्यकुमार यादवने विश्वचषक जिंकून दिला त्याला संघाबाहेर राहावा लागले तर पंधरा वर्षाच्या वैभव सूर्यवंशीला संघात स्थान मिळाले याचाच अर्थ कर्तृत्वान, निष्ठा यांना मोठे स्थान आहे. तेव्हा कार्यकर्त्यांच्या कामाचे मोजमाप झाले पाहिजे. त्याच कार्यकर्त्याला पक्षाने स्थान दिले पाहिजे.तरच दादांचे महाराष्ट्रामध्ये पक्षाचे स्वप्न पूर्ण होईल आणि कार्यकर्ते जोमाने काम करतील व दादांचे स्वप्न पूर्ण होईल असे धनंजय मुंडे म्हणाले. क्रिकेटमध्ये खेळाडू हार्ट




रिटायर झाला म्हणजे त्याला खेळता येत नाही, असे देखील शब्द प्रयोग केला. त्यांच्या या बोलण्यातून त्यांच्याकडे पक्षश्रेष्ठींनी विशेष लक्ष द्यावे, पुन्हा मंत्रिपद द्यावे अशीच त्यांची देहबोली होती. त्यांच्या भाषणामुळे सभागृह खदखदून हसले.

▶▶ पान २ वर

cmyk

अग्रलेख

# मान्सूनचा विराम आणि वाढती चिंता...

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी जून महिना म्हणजे आशेचा महिना. वर्षभराच्या आर्थिक गणिताचा पाया असलेल्या खरीप हंगामाची सुरुवात मान्सूनच्या आगमनावर अवलंबून असते. यंदा नैऋत्य मोसमी वारे नियोजित वेळेत कोकणात दाखल झाल्याने शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र मान्सूनच्या पुढील प्रवासाला अचानक ब्रेक लागण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने ही आशा आता चिंतेत बदलली आहे.

मान्सून वेळेत दाखल झाला म्हणजे संपूर्ण राज्यात पावसाची सुरुवात होईल, असा सर्वसाधारण समज असतो. प्रत्यक्षात मान्सून हा एक गुंतागुंतीचा वातावरणीय प्रवास आहे. सध्या अरबी समुद्राची शाखा सक्रिय असल्याने कोकण किनारपट्टीला समाधानकारक पाऊस मिळत असला, तरी बंगालच्या उपसागराची शाखा निष्क्रिय झाल्यामुळे महाराष्ट्राच्या अंतर्गत भागातील वाटचाल मंदावली आहे. परिणामी विदर्भ, मराठवाडा, खान्देश आणि मध्य महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना अजूनही पावसाची प्रतीक्षा करावी लागत आहे.

हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार १५ जूनपर्यंत मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी राहू शकतो. ही परिस्थिती केवळ हवामानाचा विषय नाही, तर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही गंभीर आहे. पेरणी लांबणीवर पडल्यास बियाणे, खतांची नियोजनं आणि शेतीच्या पुढील टप्प्यांवर परिणाम होऊ शकतो. अशा वेळी काही ठिकाणी होणाऱ्या विखुरलेल्या पावसामुळे पेरणीचा मोह होणे स्वाभाविक आहे; मात्र कृषी विभागाने दिलेला सावधगिरीचा इशारा दुर्लक्षित करून चालणार नाही. एक-दोन सरी म्हणजे मान्सून स्थिरावला, असा निष्कर्ष काढणे धोकादायक ठरू शकते. याहून महत्त्वाचे म्हणजे हवामानातील वाढती अनिश्चितता. जागतिक तापमानवाढ, समुद्रातील बदलती परिस्थिती आणि वातावरणातील अस्थिरता यामुळे पारंपरिक मान्सून पॅटर्न बदलत असल्याचे चित्र सातत्याने दिसत आहे. पूर्वी ठराविक वेळापत्रकानुसार पुढे सरकणारा मान्सून आता अनेकदा थांबतो, वेग घेतो किंवा दिशाही बदलतो. त्यामुळे शेतीसह जलव्यवस्थापन, आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रामीण नियोजन यामध्ये नव्या दृष्टिकोनाची गरज निर्माण झाली आहे. सरकार, कृषी यंत्रणा आणि हवामान विभाग यांच्यातील समन्वय यापुढे अधिक महत्त्वाचा ठरणार आहे. शेतकऱ्यांपर्यंत अचूक आणि वेळेवर माहिती पोहोचणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांनीही अफवा किंवा सोशल मीडियावरील अपूर्ण माहितीकडे दुर्लक्ष करून अधिकृत हवामान अंदाजांवर विश्वास ठेवणे आवश्यक आहे. मान्सूनचे आगमन वेळेत झाले, ही दिलासादायक बाब असली तरी त्याचा खंडित झालेला प्रवास चिंताजनक आहे. पुढील काही दिवस राज्यातील शेतीचे भवितव्य ठरवणारे ठरणार आहेत. निसर्गाचा हा खेळ थांबवणे कोणाच्याही हातात नसले, तरी संयम, योग्य नियोजन आणि वैज्ञानिक माहितीच्या आधारे या संकटाचा सामना करणे निश्चितच शक्य आहे. सध्या तरी बळीराजाने घाई न करता आकाशाकडे आशेने पाहत राहणे आणि अधिकृत सूचनांचे पालन करणे हाच सर्वात शहाणपणाचा मार्ग आहे.

# रहाटणी येथील नम्रता क्रिस्टल पार्क सोसायटी मध्ये संस्कार वर्ग भूमी पूजन आणि वही पूजन कार्यक्रम संपन्न

**पुणे । प्रतिनिधी**

नम्रता क्रिस्टल पार्क सोसायटी मध्ये स्वामी विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी शाखा रहाटणी, येथे संस्कार वर्ग आणि वही पूजन कार्यक्रम, स्वामी विवेकानंद केंद्रात गेल्या वीस वर्षांपासून जीवनवृती कार्यकर्ता म्हणून कार्यरत असलेले श्री सुमित शिवहारे ग्वाल्हेर,,(महाराष्ट्र आणि गोवा प्रांताचे सह संघटक )यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला,यावेळी ज्येष्ठ सदस्य प्रा.डी.एस. कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते भारत माता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर श्री सुमित शिवहारे ,प्रा.डी.एस. कुलकर्णी ,शाखेच्या प्रमुख ,



भारतीताई निर्मळ,श्री भालेकर यांच्या हस्ते संस्कार वर्ग भूमी पूजन आणि वही पूजन करण्यात आले, आपण बालकांना उत्तम शिक्षण देतो छान कपडे घेतो ,त्याच बरोबर त्यांना लहान वयातच चांगले संस्कार सुद्धा दिले पाहिजेत भारतीय संस्कृतीची ओळख,देशभक्ती, माझा देश,माझी मातृभूमी,माझी माता पिता गुरु,याविषयी सुद्धाआदर प्रेम भावना ऋण निर्देश,असे संस्कार देणे आवश्यक आहे त्यांच्या मनात, आत्मविश्वास, शिस्त, परस्परांविषयी आदराची भावना असे संस्कार या बाल वयातच देणे गरजेचे आहे.हे महत्वाचे कार्य अशा केंद्रामध्ये केले जाते.म्हणून पालकांनी आपल्या पाल्यांना अशा संस्कार वर्गात अवश्य प्रवेश द्यावा असे आवाहन प्रा.डी.एस. कुलकर्णी यांनी आपल्या भाषणातून केले, याचवेळी त्यांनी श्री स्वामी विवेकानंद यांच्या जीवनातील महत्वपूर्ण कथा सांगून बालकांच्या मनात नवीन ऊर्जा उत्साह निर्माण केला,भारतभर भारती ताई निर्मळ सारखे असंख्य कार्यकर्ते संस्कार वर्गाचे कार्य विनामूल्य,विनाशुल्क करीत आहेत. यासाठी पालकांनी सहकार्य करावे ,या शाखेचे प्रथम कार्य करणारे श्री अविनाश त्रिवेदी आणि सध्या कार्यरत असलेल्या भारतीताई निर्मळ यांचे खास अभिनंदन केले,या शाखेचे संस्कार वर्गाचे पाचवे वर्ष आहे म्हणून सर्व पालक मंडळी यांनी टाळ्या वाजवून त्यांचे अभिनंदन केले , यावेळी श्री सुमित शिवहारे यांनी बालकांचे विविध खेळ घेऊन आणि श्री स्वामी विवेकानंद, श्री छत्रपती शिवाजी महाराज, राणा प्रताप ,यांच्या जीवनातील प्रेरक कथा सांगितल्या शेवटी शाखेच्या प्रमुख भारती ताई निर्मळ यांनी सर्वांचे आभार मानले.खाऊ वाटप झाल्यानंतर कार्यक्रम संपला ,यावेळी नम्रता क्रिस्टल पार्क मधील ज्येष्ठ सदस्य पालक,बालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौसाळा महसूल मंडळात मोफत बियाणे वाटपात घोटाळ्याचा आरोप; २०० शेतकरी लाभापासून वंचित

**चौसाळा । प्रतिनिधी**

चौसाळा महसूल मंडळात मोफत बियाणे वाटप योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा आरोप शेतकऱ्यांकडून केला जात आहे. सुमारे २०० पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहिल्याचे सांगितले जात असून, महाधन (महाबीज) अधिकाऱ्यांकडून बियाणे वितरणाबाबत टाळाटाळ केली जात असल्याची शेतकरी वर्गाची तक्रार आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, योजनेसाठी आवश्यक पात्रता पूर्ण करूनही अनेकांना बियाणे मिळाले नाही.काही मोजक्या लाभार्थ्यांनाच बियाणे वाटप करून उर्वरित शेतकऱ्यांना वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. याबाबत कृषी विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.दरम्यान, खरीप हंगाम तोंडावर असताना बियाण्यांअभावी शेतकरी चिंतेत असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून वंचित शेतकऱ्यांना तातडीने बियाणे उपलब्ध करून द्यावीत,अशी मागणी सेवा सोसायटी चेअरमन दत्तात्रय नाईकवाडे यांनी केली आहे.कृषी विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.कृषी विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.तात्काळ पात्र उर्वरित शेतकरी यांना बियाणे वाटप करा नसता तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयावर आंदोलन करणार असे शेतकरी नेते दत्तात्रय नाईकवाडे यांनी इशारा दिला आहे.

**बियाणे वाटप न झाल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा – दत्तात्रय नाईकवाडे**

चौसाळा महसूल मंडळातील पात्र शेतकऱ्यांना तातडीने मोफत बियाण्यांचे वाटप करण्यात यावे, अन्यथा तालुका कृषी अधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा शेतकरी नेते दत्तात्रय नाईकवाडे यांनी दिला आहे.

# महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनाच विजयी करा-बदामराव पंडित

- गेवराईला निधी कमी पडू देणार नाही–बसवराज पाटील
- बसवराज पाटलांना मोठे मताधिक्य मिळणार–आ.धस

**गेवराई । प्रतिनिधी**

**विधान परिषद निवडणुकीत नेहमीच बीड जिल्ह्यात भाजपचा प्रभाव राहिला आहे. यावेळीही बीड जिल्ह्याच्या विकासाला अधिक गती देण्यासाठी लातूर–बीड–धाराशिव या विधान परिषद मतदार संघातील महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनाच प्रचंड मताधिक्याने विजय करा असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.**

लातूर –बीड –धाराशिव या विधान परिषद मतदार संघातील भाजपा शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्ष या महायुतीचे अधिकृत उमेदवार बसवराज पाटील यांच्या



प्रचारार्थ दिनांक ११ जून २०२६ रोजी दुपारी १ वाजता गेवराई येथील माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी बैठक संपन्न झाली. या बैठकीत मतदारांशी संवाद साधताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी उमेदवार बसवराज पाटील, आष्टी,पाटोदा,शिरूरचे आमदार भाजपाचे नेते सुरेश धस, औसाचे आ अभिमन्यू पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, जि प चे माजी अर्थ व बांधकाम सभापती यूधाजित पंडित, युवानेते शामराव पवार, गेवराई भाजप समन्वयक श्रीकांत सानप, युवानेते यशराज पंडित, उपनगराध्यक्ष ऍड भगवानराव घुंबार्डे, भाजप गटनेते ऍड राजेंद्र राक्षसभुवनकर, भाजप तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, सरपंच कैलास माने आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने सामान्य जनतेच्या हिताचे आणि विकासाचे अनेक निर्णय घेतल्याने जनता महायुतीच्या सोबत आहे. त्यामुळे बसवराज पाटील यांचा मोठ्या मताधिक्याने विजय होईल. यासाठी गेवराई मतदार संघातून त्यांच्या पाठीशी मी आणि बाळराजे पवार पूर्ण ताकद देऊ असा विश्वासही बदामराव पंडित यांनी व्यक्त केला. भाजप नेते आमदार सुरेश धस म्हणाले की, या मतदारसंघातून मी यापूर्वी निवडणूक लढवली आहे आणि निवडूनही आलो आहे. त्यावेळी मला औसा येथे आमदार असलेल्या बसवराज पाटील आणि गेवराईतून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्यासह अनेकांनी मदत केली. यावेळी त्याच जागेवर बसवराज पाटील हे निवडणूक लढत आहेत. आता मी आमदार आहे आणि बदामराव पंडित परत गेवराईत आहेत आणि त्यांच्या सोबतच बाळराजे पवार हेही आहेत. याच वेळी पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे आणि बीड जिल्ह्यातील महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी आणि मतदार एकजीवाने महायुती उमेदवाराच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहेत. त्यामुळे बसवराज पाटील यांचा विजय मोठ्या मताधिक्याने होईल असा विश्वास सुरेश धस यांनी व्यक्त केला.

# पदाधिकारी आढावा बैठकीस बहुसंख्येने उपस्थित राहावे

**बीड । प्रतिनिधी**





**बीड जिल्हा पदाधिकारी आढावा बैठकीचे आयोजन दि.१२ जुन २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता हॉटेल निलकमल, नगर रोड बीड येथे करण्यात आले आहे. सदरील बैठकीस माजी विरोधीपक्षनेते तथा आमदार अंबादासदादा दानवे हे आढावा घेणार आहेत तसेच मार्गदर्शनही करणार आहेत.**

या आढावा बैठकीत बी.एल.ए नियुक्ती, स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघ, पदवीधर मतदार संघ तथा स्थानिक संघटनात्मक मुद्द्यांबाबत आढावा घेण्यात येणार आहे. सदरील बैठकीस जिल्हा संपर्कप्रमुख, विधानसभा संपर्कप्रमुख, आजी–माजी खासदार आमदार, जिल्हाप्रमुख, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, महिला आघाडी, युवासेना, सर्व जिल्हास्तरीय पदाधिकारी या सर्वांनी बहुसंख्येने वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख गणेश वरेकर व उल्हास गिराम यांनी केले आहे.

पान १ वरून...

## केरळमध्ये निपाहचा

पाठवण्यात आले असून, त्यांच्या अंतिम अहवालाची प्रतीक्षा आहे. हा रुग्ण कोझिकोडमधील फेरोके येथील रहिवासी आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात करण्यात आलेली या रुग्णाची प्राथमिक निपाह चाचणी पॉझिटिव्ह आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी गुरूवारी (दि. ११) दिली. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रुग्णाची प्रकृती चिंताजनक असून त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आहे. सुरुवातीला त्याला शहरातील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, तिथून बुधवारी उशिरा रात्री शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आले. त्याच्या उपचारासाठी रुग्णालयात स्वतंत्र आयसोलेशन वॉर्ड (विलगीकरण कक्ष) तयार करण्यात आला आहे. दरम्यान, आरोग्य मंत्री के. मुरलीधरन यांनी राज्याच्या राजधानीत वैद्यकीय शिक्षण संचालक, आरोग्य सेवा संचालक आणि इतर उच्च अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेतली आहे.

--------------

## शेतकरीराजा चिंतेत..!

अनेक भागांतील शेतकरी पेरणीसाठी पहिल्या दमदार पावसाची प्रतीक्षा करत आहेत. काही ठिकाणी घाईघाईने पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवू शकते, अशी भीती कृषी तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. मुंबईत ११ जून रोजी मान्सून दाखल होण्याची अपेक्षा होती. मात्र अद्याप त्याची कोणतीही स्पष्ट चिन्हे दिसत नाहीत. पुढील किमान पाच दिवस तरी मुंबईसह परिसरात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता कमी असल्याने उष्णता आणि दमट वातावरण कायम राहणार आहे. मुंबईत मान्सूनची सक्रियता वाढल्यानंतरच राज्याच्या इतर भागांमध्येही पावसाचा वेग वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.ङ्गदरम्यान, हवामान विभागाने पुढील तीन ते चार दिवसांत राज्याच्या आणखी काही भागांत मान्सून प्रगती करेल, असा अंदाज वर्तवला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आशा अद्याप कायम आहेत. मात्र प्रत्येक दिवसागणिक वाढणारी प्रतीक्षा आणि पेरणीचा खोळंबा यामुळे ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. आता सर्वांच्या नजरा मान्सूनच्या पुढील वाटचालीकडे लागल्या असून, लवकरच राज्यभर दमदार पावसाची हजेरी लागावी, अशी प्रार्थना बळीराजा करत आहे.

----------

## देशात नरेंद्र राज्यात देवेंद्र

श्रद्धांजली वाहण्यात आली. आंदोलनकर्त्यांनी केंद्र सरकार आणि शिक्षण मंत्रालयासमोर काही प्रमुख मागण्या ठेवल्या आहेत. जर कोणत्याही परीक्षेचा पेपर फुटला, तर प्रभावित झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला शासनाकडून १०,००० रुपये आर्थिक नुकसानभरपाई मिळाली पाहिजे. परीक्षा आयोजित करण्यासाठी टेंडर घेणाऱ्या कंपन्यांचे कडक ऑडिट झाले पाहिजे. मंत्र्यांच्या जवळच्या मित्रांना किंवा नातेवाईकांना अशी टेंडर्स मिळता कामा नयेत. परीक्षेचा निकाल एका ठराविक मुदतीतच जाहीर झाला पाहिजे. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर येण्या–जाण्याचा वाहतूक खर्च शासनाने द्यावा. शिवरायांचा इतिहास : एनसीइआरटी च्या पाठ्यपुस्तकातून वगळलेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी साम्राज्याचा नकाशा पुन्हा समाविष्ट करण्यात यावा. यापुढे तरुण पिढी कोणत्याही हिंदू–मुस्लिम किंवा धार्मिक राजकारणाला बळी पडणार नाही असे आश्वासन सर्वांनी दिलं पाहिजे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या. सरकारचे हिंदू–मुस्लिम राजकारण यापुढे चालणार नाही, असा इशाराही कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने देण्यात आला. अभिजीत दीपके म्हणाले की, ''मुख्यमंत्री म्हणतात की या आंदोलनात सहभागी झालेले लोक समाजात अराजकता पसरवत आहेत. मला मुख्यमंत्र्यांना विचारायचे आहे की, हक्कासाठी लढणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेणे म्हणजे अराजकता पसरवणे आहे का? मुख्यमंत्री टीका करतात की आम्हाला संविधान माहीत नाही, आम्ही फक्त पुस्तक हातात पकडले आहे. मला त्यांना उलट विचारायचे आहे की, चोरून पहाटेचा शपथविधी पार पाडणे कोणत्या संविधानात लिहिले आहे, ते आधी त्यांनी सांगावे.

--------------

## पक्षाच्या हिताला प्राधान्य

कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एनडीएच्या बैठकीमुळे १० जूनऐवजी हा कार्यक्रम ११ जून रोजी आयोजित करण्यात आला होता. सुनेत्रा पवार पुढे म्हणाल्या, राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून वेगळ्या परिस्थितीत मी जबाबदारी घेतली आहे. येणाऱ्या सगळ्या गोष्टींची मला जाणीव होती. पदाधिकारी कार्यकर्ता आणि त्यांची निष्ठा माझ्या लक्षात आहे. योग्यवेळी संधी दिली जाईल असे मत सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केले. आतापर्यंत जे घडले ते मी समजून घेतले. मी पक्षाच्या हिताला प्राधान्य देईल. कुणाचा हस्तक्षेप असेल तर मी लक्ष देईल. दादा ज्याप्रमाणे कडक निर्णय घ्यायचे तो माझा स्वभाव नसला तरी मी तो निर्णय घेईल असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. अजित पवारांना जो विकसित महाराष्ट्र अपेक्षित होता त्यानुसार आपण काम करत राहू. शिव –शाहू –फुले आंबेडकर यांची विचारधारा पुढे घेऊन जाणे म्हणजे सर्वांना सोबत घेऊन जाणे, असे सुनेत्रा पवार म्हणाल्या. ग्रामीण आणि शहरी भागात पक्षाची ताकद वाढवण्यासाठी प्रभावी उपायोजना करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला काम करावे लागणार आहे. आपल्या पक्षाचा एकही कार्यकर्ता मतदानापासून वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी. बूथ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचा समान राखला जाईल. संघटना मजबूत करणे गरजेचे आहे. प्रत्येक कार्यकर्ता हा पक्षाचा ऑक्सिजन आहे. सर्वांनीच लोकसंग्रह वाढवणे, समस्या समजून घेणे त्यासाठी सासत्याने प्रयत्न करणे ही कार्यकर्त्यांची जबाबदारी आहे. सर्वानी प्रयत्न करावेत, गाव, वाडी, वस्ती, शहर अशा ठिकाणी कार्यकर्तांची फळी निर्माण करायला हवी, पक्षात ज्येष्ठांचा सन्मान करणे, महिलांचा आदर हे देखील करणे गरजेचे आहे, असे त्या म्हणाल्या.

------------

## शरद पवारांची राष्ट्रवादी

तृणमूल–काँग्रेस विलिनीकरणाच्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) भविष्यात काँग्रेसमध्ये विलीन होऊ शकते का, असा प्रश्न सुप्रिया सुळे यांना विचारण्यात आला. त्यावर त्यांनी कोणतीही ठोस भूमिका जाहीर न करता, पक्षाच्या निर्णयप्रक्रियेत सर्वांचे मत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. त्यांनी सध्या पक्ष संघटना मजबूत करण्यावर आणि जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित असल्याचे स्पष्ट केले असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच अशा विषयांवर निर्णय घेताना पक्ष नेतृत्व आणि कार्यकर्त्यांशी चर्चा होईल, असे संकेत त्यांनी दिले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे आमदार रोहित पवार यांनीही या विषयावर प्रतिक्रिया देताना, देशहितासाठी आणि भाजपविरोधी मजबूत पर्याय उभा राहण्यासाठी आवश्यक असेल तर भविष्यात विविध राजकीय पर्यायांचा विचार केला जाऊ शकतो, असे संकेत दिले. त्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीच्या भविष्यातील राजकीय भूमिकेबाबत चर्चा अधिक रंगू लागली आहे. भविष्यात विरोधी पक्षांमध्ये अधिक व्यापक आघाडी किंवा विलिनीकरणाचे प्रयत्न झाले, तर त्याचा परिणाम महाराष्ट्रासह राष्ट्रीय राजकारणावर होऊ शकतो. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण हा विरोधकांसाठी महत्त्वाचा मुद्दा मानला जात आहे. मात्र सध्याच्या घडीला राष्ट्रवादी काँग्रेस काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याचा कोणताही अधिकृत प्रस्ताव किंवा निर्णय समोर आलेला नाही. त्यामुळे या सर्व चर्चा सध्या केवळ राजकीय तर्क–वितर्कांच्या पातळीवरच असल्याचे दिसून येते. एकंदरीत, सुप्रिया सुळे यांनी विलिनीकरणाच्या शक्यतेला स्पष्ट दुजोरा दिला नाही तसेच पूर्ण नकार ही दिला नाही. त्यामुळे भविष्यातील राजकीय समीकरणांबाबत उत्सुकता कायम असली तरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या काँग्रेसमध्ये विलिनीकरणाबाबत सध्या कोणतीही अधिकृत घडामोड झालेली नाही.

--------------

## एसटी कर्मचाऱ्यांसाठी

तसेच वेतनवाढीची थकबाकीही आर्थिक परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने अदा केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. त्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सोबत एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांची बैठक आयोजित करण्यात येईल असे देखील ग्वाही दिली. बैठकीत कर्मचाऱ्यांचे वेतन, भत्ते, सेवाशर्ती, रिक्त पदभरती, बसस्थानक विकास, कल्याणकारी योजना तसेच महामंडळाच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासंदर्भातील विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही देत मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले. कामगार संघटनांशी सातत्याने संवाद साधून प्रश्न सोडविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे सांगताना मंत्री सरनाईक म्हणाले, ''महामंडळाच्या सर्व संघटनांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी असलेली समिती तातडीने स्थापन करण्यात यावी. उत्पन्नवाढीसाठी समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी.'' महामंडळाच्या आधुनिकीकरणा वर भर देताना त्यांनी सांगितले की, आतापर्यंत जवळपास साडेतीन हजार नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली २०३५ पर्यंत एसटीचा ताफा १०० टक्के इलेक्ट्रिक करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून त्यासाठी राज्यभर आवश्यक चार्जिंग स्टेशन उभारण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या बैठकीस महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी प्रियंका नारनवरे, वरिष्ठ अधिकारी, विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी तसेच राज्यभरातील कामगार प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तिरुवनंतपुरम येथे माध्यमांशी बोलताना आरोग्य मंत्र्यांनी सांगितले की, लक्षणांवरून हा संसर्ग निपाह असण्याची दाट शक्यता आहे. हा रुग्ण अनेक लोकांच्या संपर्कात आला आहे. तो आधी खासगी रुग्णालयाच्या ओपीडी विभागात गेला होता, तिथून त्याचे एमआरआय स्कॅनिंग आणि नंतर इकोकार्डियोग्राम चाचणी करण्यात आली. या पार्श्वभूमीवर, संबंधित खासगी रुग्णालयातील सर्व कर्मचाऱ्यांना क्वारंटाईन (विलगीकरणात) जाण्यास सांगण्यात आले आहे,'' असे मुरलीधरन यांनी स्पष्ट केले. रुग्णाने एक गोडाऊन भाड्याने घेतले होते आणि त्याने स्वतः त्या जागेची साफसफाई केली होती. तो एक लहान व्यावसायिक आहे. त्या भागात फ्रूट बॅट्स (वटवाघुळे – जे निपाह विषाणूचे नैसर्गिक वाहक आहेत) असण्याची शक्यता आहे. हा रुग्ण एकदा तापातून बरा झाला होता, पण त्याला पुन्हा लक्षणे दिसू लागल्याने रुग्णालयात दाखल करण्यात आले, अशी माहिती मंत्र्यांनी दिली.

-------------

## लाडक्या बहिणींना दोन

केली आहे. या थकीत हप्त्यासाठी राज्य शासनाकडून तब्बल ३४४ कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करण्यात आला असून, यामुळे महिलांमधील प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळणार आहे. शेवगाव–पाथर्डी विधानसभा मतदारसंघाच्या भाजप आमदार मोनिका राजळे यांनी यासंदर्भात सोशल मीडियावर पोस्ट करत लाभार्थी महिलांच्या खात्यात मे महिन्याचा १५०० रुपयांचा हप्ता लवकरच वर्ग होणार असल्याचे स्पष्ट केले. राजळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या १२ ते १५ जून या कालावधीत थेट बँक खात्यात ही रक्कम जमा होण्याची दाट शक्यता आहे. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाने महिला व बालविकास विभागाला मे महिन्याचा हप्ता वितरित करण्यासाठी ३४४ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली असून, या संदर्भातील अधिकृत शासन निर्णय १० जून रोजी जारी करण्यात आला आहे. आमदार मोनिका राजळे यांच्या या घोषणेमुळे राज्यातील लाखो लाभार्थी महिलांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यापूर्वी मे महिन्याचा हप्ता वेळेवर जमा न झाल्यामुळे अनेक महिलांनी चिंता आणि संभ्रम व्यक्त केला होता. मात्र आता शासनाकडून थेट निधी मंजूर झाल्याने आणि संभाव्य तारखा समोर आल्यामुळे महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान, ज्या महिला कोणत्या कारणास्तव अपात्र ठरल्या आहेत, त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही आणि त्यांच्या खात्यात मे महिन्याचा कोणताही हप्ता जमा होणार नाही, हे देखील स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता अवघ्या दोन–तीन दिवसांतच पात्र बहिणींच्या बँक खात्यात पैशांची पहिली देवाणघेवाण सुरू होणार असून, संपूर्ण राज्याचे लक्ष आता शासनाच्या या पुढील प्रक्रियेकडे लागले आहे.

------------

## वर्धापन दिन : मुंडे, भुजबळ, तटकरे,

मात्र त्यांच्याच भाषणाची जोड घेत प्रफुल पटेल यांनी धनंजय मुंडे यांना समाधानकारक उत्तर दिले. बोलताना म्हणाले की, धनंजयचे भाषण चांगले झाले. धनंजय तुम्ही चिंता करू नका. रिटायर्ड हार्ड म्हणजे खेळाडू पुन्हा खेळण्यासाठी येऊ शकतो. तुम्ही बाद खेळाडू झालेले नाहीत. रिटायर हार्ट खेळाडू आहात त्यामुळे काळजी करू नका, असे म्हणत त्यांनी धनंजय मुंडे यांच्या पुन्हा मंत्रिमंडळातील प्रवेशाला एक प्रकारे संमती दर्शवली. तर छगन भुजबळ यांनीही आपल्या भाषणामध्ये सुनील तटकरे यांच्यावर मार्मिक शब्दांमध्ये नाराजी व्यक्त केली. राजकारणाचा खेळ करू नका, असा चिमटा घेतला. तर तटकरे यांनीही आपल्या भाषणात भुजबळ यांचा उल्लेख करत भुजबळ साहेब बुद्धिबळाचे नसले तरी कबड्डीचे चांगले खेळाडू आहेत, ते कबड्डी खेळताना कधी एक खेळाडू कधी दोन खेळाडू बाद करून येतात, असे नाही तर सहा सात घडी देखील घेऊन येतात. आता आपल्याला सुनेत्रा वहिनींच्या नेतृत्वाखाली या व्यासपीठावर विविध क्षेत्रातील खेळाडू आहेत आणि हे खेळाडू पुन्हा दादांची स्वप्न पूर्ण करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेष म्हणजे वर्धापन दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमांमध्ये मुंडे, भुजबळ, तटकरे आणि पटेल यांच्या भाषणाची चर्चा अधिक झाली.

--------------

## थोडक्यात

### आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ निघणाऱ्या मातंग क्रांती मोर्चात सहभागी व्हावे –कांबळे

माजलगाव । प्रतिनिधी

सकल मातंग समाजाच्या वतीने बीड येथे दि. १६ जुनला आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ काढण्यात येणा–या मातंग क्रांती मोर्चात माजलगाव तालुक्यातील प्रत्येक गावातील समाजबांधव आणण्यासाठी पुढाकार घेणार असुन समाजबांधवांनी या मोर्चात सहभागी व्हावे असे आवाहन उपसरपंच अनिलराधे कांबळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.




भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना आरक्षणाचा अधिकार दिला असला तरी, त्याचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळालेला नाही. मातंग समाज आजही शिक्षण, रोजगार, प्रशासन, राजकीय, प्रतिनिधीत्व, जमीनधारणा, उद्योग – व्यवसाय आणि आर्थिक विकासाच्या विवीध क्षेत्रात अतीवंचित आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील लाभ काही मोजक्या घटकांपुरता केंद्रित झाल्याने मातंग समाजास अपेक्षित प्रतिनिधीत्व आणि प्रगती साधता आलेली नाही. भारतीय सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास घटनात्मक मान्यता दिली असून सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या वस्तुनिष्ठ निकषांवर आरक्षणाचे न्याय वितरण करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. हा मोर्चा कोणत्याही एका नेत्याचा, पक्षाचा किंवा व्यक्तीच्या नावाचा नाही हा मातंग समाजाच्या अस्तित्वाच्या हक्काचा आणि भविष्यासाठीच्या लढ्याचा मोर्चा आहे. त्यामुळे शहरासह तालुका परिसरातील समाजबांधवांनी गटबाजी, हेवेदावे विसरून पक्ष, संघटना बाजुला ठेवून बीड येथे दि. १६ ला होणा–या मातंग क्रांती मोर्चाला उपस्थित रहावे असे आवाहन उपसरपंच अनिलराधे कांबळे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### मुख्याध्यापक आंधळे यांना राज्यस्तरीय युवा लोकमित्र समाजरत्न पुरस्कार जाहीर!

बीड । प्रतिनिधी

गेल्या अडीच दशाकांपासून बीड जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा आणि धगधगत्या संघर्षाचा ठसा उमटवणारे संत तुकाराम प्राथमिक विद्यालय'चे मुख्याध्यापक प्रा. आश्रुबा (बबनराव) दगडू आंधळे यांना यंदाचा अत्यंत प्रतिष्ठित आणि मानाचा राज्यस्तरीय 'युवा लोकमित्र समाजरत्न पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. 'साप्ताहिक युवा लोकमित्र' वृत्तपत्राच्या ५ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून 'युवा लोकमित्र परिवार'च्या उच्चस्तरीय पुरस्कार निवड समितीने प्रा. बबनराव आंधळे यांच्या अष्टपैलू जीवनप्रवासाची दखल घेत या सर्वोच्च पुरस्कारासाठी त्यांची एकमुखाने निवड केली आहे.



बबनराव आंधळे यांनी १४ जून १९९३ रोजी 'अरुणा असफअली महिला मंडळ बीड' संचलित 'संत तुकाराम प्राथमिक विद्यालय' (तेलगाव रोड, बीड) येथे मुख्याध्यापक म्हणून सूत्रे हाती घेतली. आजतागायत त्यांनी आपल्या कुशल प्रशासकीय आणि संवेदनशील नेतृत्वाने हजारो गरीब, मागासवर्गीय व वंचित विद्यार्थ्यांना शिक्षण्याच्या मुख्य प्रवाहात आणले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना मागासवर्गीय वस्तीगृहात प्रवेश मिळवून देण्यासाठी त्यांनी नेहमीच मोलाचे सहकार्य केले आहे.

### बोट दुर्घटना; ना. पंकजाताई मुंडेंनी महिला भाविकांच्या मृत्यूबद्दल व्यक्त केली हळहळ

माजलगांव : तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे बोट उलटून झालेल्या दुर्घटनेत दोन महिला भाविकांचा दुर्दैवी मृत्यू झाला, ही घटना अतिशय वेदनादायी आहे, या घटनेबद्दल मी दुःख व्यक्त करते अशा शब्दांत राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी हळहळ व्यक्त केली.पुरूषोत्तम पुरी येथे सध्या अधिकमासा निमित्त राज्यभरातून आलेल्या भाविकांची मोठी गर्दी होत आहे. गोदावरी नदीकाठी हे मंदिर असल्याने काही भाविक बोटीतून दर्शनाला निघाले होते पण अचानक बोट उलटली आणि यात सिंदखेडराजा तालुक्यातील रहिवासी सौ. प्रमिला शेषराव राठोड (वय ५५ वर्षे) व सौ. कांताबाई ज्ञानोबा आंधळे (वय ६० वर्षे) यांचे दुःखद निधन झाले. या अपघातात इतर काही भाविक जखमी झाले असून त्यांच्यावर माजलगाव येथील शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत. ही घटना अतिशय दुर्दैवी व वेदनादायी आहे, ईश्वर दिवंगत आत्म्यांना सद्गती देवो व त्यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याची शक्ती प्रदान करो, अशा शब्दांत ना. पंकजाताईंनी मृत्यू झालेल्या महिला भाविकांविषयी आपल्या संवेदना व्यक्त केल्या.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार, दि. १२ जून २०२६



## पत्नी व नातेवाईकाच्या नावे वादग्रस्त मिळकत खरेदी केल्याप्रकरणी

# तलाठी आभारेंना कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करा

**पात्रुड । प्रतिनिधी**

**येथील वादग्रस्त गट नं. १०५ मधील प्लॉट स्वतःच्या पत्नी व नातेवाईकाच्या नावे खरेदी केल्याप्रकरणी तलाठी रुपचंद आभारे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई व फौजदारी गुन्हे दाखल करुन कायमस्वरुपी सेवेतुन सेवा मुक्त करण्याच्या मागणीसाठी दि १० जुन बुधवार रोजी पासुन माजलगाव उपविभागीय कार्यालयासमोर पत्रकाराच्यां वतीने बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे.**

लाचखोर;भ्रष्टाचारी रूपचंद आभारे यांना सेवेतून मुक्त करा

यासंदर्भात पत्रकारांच्या वतिने पत्रकार राजरतन डोंगरे, पत्रकार नईम आतार, पत्रकार वहीद पठाण यांनी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना दिलेल्या निवेदन असे नमूद करण्यात आले आहे की, माजलगाव उपविभागीय कार्यालया अंतर्गत कार्यरत असलेले माजलगाव सज्जाचे ग्राम महसुल अधिकारी रुपचंद सुधाकर आभारे यांच्या स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी आपल्या पदाचा आणि अधिकाराचा गैरवापर केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे.मौजे माजलगाव येथील वादग्रस्त गट नं. १०५ प्लॉट स्वतः च्या पत्नीच्या व नातेवाईकाच्या नावे खरेदी केल्या प्रकरणी तलाठी रुपचंद आभारे यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करुन फौजदारी गुन्हे दाखल करण्याचा प्रस्ताव माजलगाव मंडळ अधिकाऱ्यांनी तहसील कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे.यामध्ये अकबर दादामियाँ शेख रा.आयशा नगर माजलगाव यांनी तहसील कार्यालयाकडे या संदर्भात तक्रार अर्ज दाखल केलेला होता. त्यामध्ये माजलगाव येथील वादग्रसत गट नं. १०५ मधील क्षेत्राबाबत मा. दिवाणी न्यायालयात स्पे. दि.दा.क्रं.१९/२०२४ हा खटला सुरु असताना तसेच या प्रकरणात सह. दुय्यम निबंधक कार्यालयात विज पेन्डन्स देखील रजिस्टर आहे. म्हणजेच ही जागा पुर्णपणे कायदेशीर वादात अडकली असताना या गटातील मुळ मालक शफिक सत्तार बागवान यांनी अनेक लोकांना प्लॉट विक्री केले होते. या परिस्थीचा गैरफायदा घेत, संबंधित ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) रुपचंद आभारे यांनी स्वतः च्या अधिकाराच्या



माजलगाव येथील पत्रकारांचे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन

क्षेत्रात येत असूनही सर्व नियम धाब्यावर बसवुन बेकायदेशीररित्या आपली पत्नी घोषणा रुपचंद आभारे उर्फ घोषणा चिंतामन तिमाडे यांच्या नावावर प्लॉट क्रं. १४ खरेदी केला. एवढ्यावरच न थाबंता त्यांनी पत्नीची बहिण (मेव्हणे) रजनी जितेंद्र उपासे यांच्या नावे सामाईक तसेच स्वतंत्रपणे प्लॉट नं.५ अणि प्लॉट नं. १५ असे कोट्यावधी रुपयांचे भुखंड खरेदी केले. गट नं. १०५ या वादग्रस्त गटातील खरेदीखताच्या आधारे फेरफार घेवुनही दि.२० जानेवारी २०२६ रोजी अर्जदाराने तक्रार अर्ज आक्षेप अर्ज माजलगाव तलाठी कार्यालयात देवुनही ग्राममहसुल अधिकारी रुपचंद आभारे यांनी दि. १८ जानेवारी २०२६ रोजी सर्व फेरफार नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर अत्यंत चालाखीने स्वतः च्या पत्नीच्या नावावर आसलेला फेरफार क्रं. १४८२४ वर कोणताही आक्षेप किंवा तक्रार प्राप्त असुनही नोंदवला नाही. मात्र त्याच दिवशी नोंदवलेल्या इतर सर्वसामान्य नागरीकांच्या फेरफार नोंदीवर आक्षेप नोंदंवुन ते विवादग्रस्त नोंदवहीत वर्ग केले. परिणामी तत्कालीन मंडळ अधिकाऱ्यांनी आक्षेप नसलेला (तलाठी आभारे) यांच्या पत्नीचा व नातेवाईकांचा फेरफार मंजुर केला या संदर्भात मंडळ अधिकारी यांना तहसिलदार यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या चौकशी अहवालात तलाठी रुपचंद आभारे यांचे गंभीर गैरवर्तन आढळुन आले आहे. शासकीय नियमाचे उल्लंघन करुन महसुल कर्मचाऱ्यांनी स्वतः च्या कार्यक्षेत्रात जमीन खरेदी करताना शासनाची पुर्व परवानगी घेणे आवश्यक असताना तशी कोणत्याही प्रकारची परवानगी तलाठी आभारे यांनी घेतलेली नाही.हितसंबंधचा गैरफायदा घेत त्यावर मिळकतीचे प्रत्यक्षातले बाजार मुल्य शासकीय मुल्यांकन दरापेक्षा कैक पटीने जास्त आहे.स्वतः च्या आधिकाराचा गैरवापर करून खातेदारासोबत हितसंबंधाचा संघर्ष निर्माण करण्यात आलापदाचा वैयक्तीक फायद्यासाठी वापर करणे,संशयास्पद व्यवहार करणे आणि पक्षपाती वर्तन करण्याचा आहे.यामुळे महसुल प्रशासनाचे थेट उल्लंघन करणारे आहे. सबब संबंधित तलाठी यांच्यावर कडक शिस्तभंगाची कार्यवाही करुन व फौजदारी गुन्हा नोंदवण्यात यावा असा निष्कर्ष माजलगाव मंडळ अधिकारी यांनी माजलगाव तहसिदार यांना दिलेल्या अहवालात नोंदवला आहे.तलाठी रुपचंद आभारे यांच्या संदर्भात मंडळ अधिकारी माजलगाव यांनी दिलेल्या चौकशी अहवालानुसार दिं ०८ जुन २०२६ पर्यत कार्यवाही करुन त्यांना कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करण्यात यावे, नसता याप्रश्नी उपविभागीय कार्यालय माजलगाव समोर दि.१० जुन बुधवार रोजीपासुन बेमुदत दररोज सकाळी ११:०० ते सायं ६:०० बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला होता. परंतु ग्राम महसुल अधिकारी रुपचंद आभारे यांच्यावर उपविभागीय अधिकारी यांनी कोणतीही कारवाई न केल्याने पत्रकार राजरतन डोंगरे, नईम आतार व पत्रकार वहीद पठाण, सह पाठिंबा देणारे गोरख टाकणखार माजी भारतीय जनता पार्टी दलीत आघाडी माजलगाव ता . अध्यक्ष व राजेभाऊ भिसे पँथर यांनी वरील विषय पाठिंबा देण्यात आला आहे व यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर दि १० जुन बुधवार रोजी पासुन बेमुदत धरणे आंदोलनास बसले आहेत.

## पेशवा प्रतिष्ठानच्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचे पहिले यश; विद्यार्थ्याचे एमबीबीएस शिक्षण पूर्ण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक बळ देण्याच्या उद्देशाने पेशवा प्रतिष्ठान, अंबाजोगाई यांनी सुरू केलेल्या बिनव्याजी शैक्षणिक मदत योजनेचा पहिला विद्यार्थी डॉ. पवन पंढरीनाथ कुलकर्णी हा आता वैद्यकीय शिक्षण (एमबीबीएस) पूर्ण करून डॉक्टर झाला आहे. ही बाब प्रतिष्ठानसाठी तसेच संपूर्ण अंबाजोगाई परिसरासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

आर्थिक अडचणींमुळे अनेक विद्यार्थ्यांची उच्च शिक्षणाची स्वप्ने अपूर्ण राहतात. ही गरज ओळखून पेशवा प्रतिष्ठानने काही वर्षांपूर्वी बिनव्याजी शैक्षणिक मदत योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांना कोणतेही व्याज न आकारता आर्थिक मदत देण्यात येते, ज्यामुळे त्यांना शिक्षणाचा प्रवास निर्धास्तपणे पूर्ण करता येतो.

या योजनेचा लाभ घेणाऱ्या पवन कुलकर्णी या पहिल्या विद्यार्थ्याने एमबीबीएस पदवी यशस्वीरित्या संपादन करून प्रतिष्ठानच्या कार्याची



सार्थता सिद्ध केली आहे. पवन कुलकर्णी यास मागील चार वर्षापासून दरवर्षी पन्नास हजाराची बिनव्याजी शैक्षणिक मदत करण्यात येते.विद्यार्थ्याच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा शैक्षणिक उपक्रमांना अधिकाधिक सहकार्य केल्यानेच सदरील उपक्रम सुरू आहे. पवन कुलकर्णी याने पेशवा प्रतिष्ठान व या उपक्रमास मदत करणाऱ्या दानशूर व्यक्तींचे आभार व्यक्त केले. यावेळी पेशवा प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करताना सांगितले की, शिक्षण हीच खरी समाजसेवा असून गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याचा आमचा संकल्प यापुढेही कायम राहील. पेशवा प्रतिष्ठान अश्याच समाजपयोगी कार्यासाठी कायम अग्रेसर राहील.

विद्यार्थ्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक व वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे तसेच पेशवा प्रतिष्ठानच्या उपक्रमाचे कौतुक केले आहे. अधिक माहितीसाठी अमृत महाजन, सुजित दीक्षित, संतोष कुलकर्णी, राहुल कुलकर्णी, डॉ महेश अकोलकर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येते.

## माजलगावात चढ्या भावाने खत विक्री

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील गणेश कृषी विकास केंद्र व दत्त एजन्सी येथे शेतकऱ्यांना शासनमान्य दरापेक्षा जास्त दराने खत विक्री केल्याचा प्रकार समोर आला आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर कृषी विभागाने तपासणी केली असता अनेक बाबी निदर्शनास आल्याने संबंधित विक्रेत्यांविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, खताची शासनमान्य किंमत सुमारे २७०० असताना दत्त एजन्सीकडून ३४५० तर गणेश कृषी विकास केंद्राकडून ३६५० दराने खत विक्री करण्यात आल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली होती. या प्रकारामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.कृषी अधिकारी मुनगिलवार यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित ठिकाणी तपासणी करण्यात आली. यावेळी विक्री नोंदी, साठा रजिस्टर व इतर कागदपत्रांची पडताळणी करून पंचनामा करण्यात आला.

या कारवाईचे भाई नारायण गोले (शेतकरी कामगार पक्ष), तुकाराम नावडकर (तालुका अध्यक्ष, संभाजी ब्रिगेड, माजलगाव) तसेच शेतकरी सलीम खान पठाण यांनी स्वागत केले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करून त्यांचे परवाने रद्द करावेत, अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे अडचणीत असताना खत विक्रेत्यांकडून होणारी अवाजवी दरवाढ ही गंभीर बाब असून प्रशासनाने अशा प्रकारांवर कायमस्वरूपी आळा घालावा, अशी मागणी शेतकरी व सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

## तुलसी फॅशन डिझाईन कॉलेजमध्ये नेत्र तपासणी व नेत्रदान शिबिर संपन्न

बीड । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक नेत्रदान दिनानिमित्त बुधवार, दि.१० जून रोजी मोफत नेत्र तपासणी व नेत्रदान प्रतिज्ञा नोंदणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हा रुग्णालय, बीड यांच्या सहकार्याने झालेल्या या शिबिरात ५९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून आपली नेत्र तपासणी करून घेतली.




या शिबिरासाठी प्रमुख पाहुण्या व तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून जिल्हा रुग्णालयाच्या नेत्ररोग अधिकारी श्रीमती सुप्रिया गोपाळघरे–मोराळे आणि जिल्हा रुग्णालयाच्या नेत्रदान समुपदेशक श्रीमती सी. एस. गुरव तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे उपस्थित होत्या.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना तज्ज्ञांनी सांगितले की, आपले डोळे मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करू शकतात. एका व्यक्तीचे नेत्रदान दोन अंध बांधवांना नवी दृष्टी देऊ शकते. त्यामुळे समाजात नेत्रदानाविषयी असलेले सर्व गैरसमज दूर करून जास्तीत जास्त नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात पुढे येणे गरजेचे आहे. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून प्रेरणा घेत यावेळी ४० विद्यार्थिनींनी मृत्यूनंतर नेत्रदानाचा संकल्प करत आपले अधिकृत प्रतिज्ञापत्रही भरून दिले.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्या सौ. सय्यद शहाना, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. श्वेता वंजारे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गीतांजली कांबळे यांनी केले, तर आभार प्रा. विद्या अवघडे यांनी मानले.

## फसव्या कर्जमाफी आदेशाची जिल्हा कचेरीसमोर शेतकरी पुत्रांकडुन होळी

बीड । प्रतिनिधी

नागपूर येथे झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र शासनाने काढलेल्या शासन निर्णयात (जीआर) अनेक जाचक अटी व शर्ती घातल्याने मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही कर्जमाफी फसवी असल्याचा आरोप शेतकरी हक्क मोर्चाचे नेते राजेंद्र आमटे यांच्यासह शेतकऱ्यांनी या जी आर ची होळी केली.

शेतकरी पुत्र संघटना व शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शासन निर्णयाची प्रत जाळून निषेध आंदोलन करण्यात आले. तसेच गावोगावी जाऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करून सरसकट कर्जमाफीसाठी पुन्हा आंदोलन उभारण्याचा इशारा देण्यात आला. राजेंद्र आमटे म्हणाले की, नागपूर आंदोलनानंतर जाहीर झालेल्या



कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ अनेक शेतकऱ्यांना मिळणार नाही. अनेक बँकांनी शेतकऱ्यांची जुनी व नवी कर्जखाती एकत्रित केल्यामुळे अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहतील. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही नव्या योजनेतून वगळण्यात आले आहे. सरकारने कर्जमाफीची घोषणा केली असली तरी तिचा लाभ केवळ कागदोपत्री राहणार असून शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष काहीही पडणार नाही, असा आरोपही त्यांनी केला.या आंदोलनात डॉ. गणेश ढवळे, प्रा. ज्ञानेश्वर राऊत, अमर शेख, डॉ. संजय तांदळे, इनुस शेख, सर्फराज खान, हनुमान घोडके, रामधन जमाले, भीमराव कुटे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ''बच्चू कडू हा शेतकऱ्याचा गुन्हेगार आहे; आमदारकीच्या तुकड्या साठी शेतकरी आंदोलन मातीत घालण्याचे काम बच्चू कडू याने केले.

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### आर्थिक व्यवहारातून

तक्रार केली, तर तुला जिवंत ठेवणार नाही, अशी धमकी देऊन आरोपींनी तिला दुपारपर्यंत त्याच निर्जन स्थळी डांबून ठेवले. दुपारनंतर फिर्यादीला सोडून आरोपींनी पळ काढला. या घटनेनंतर घाबरलेल्या अनिल पत्की यांनी नातेवाईकाना सांगितले. त्यानंतर रुग्णालयात उपचार घेऊन सायंकाळच्या सुमारास परळी शहर पोलीस ठाणे गाठून माहिती दिली. पोलिसांनी याप्रकरणी अपहरण, मारहाण आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास परळी शहर पोलीस करत आहेत. आर्थिक व्यवहारातून निर्जन स्थळी नेत तिघांकडून आठ तास डांबून ठेवत बेल्ट – काठीने बेदम मारहाण करण्यात आली. या व्यवहारापोटी पत्की यांनी यादव यांना १ लाख रुपये परत केले असे असतानाही यादव यांनी आणखी चार लाख रुपयांसाठी तगादा लावला होता. सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेसहा दरम्यान केलेल्या मारहाणी नंतर लिपिकाला आरोपीच्या दुकानासमोर सोडून देण्यात आले. ही मारहाण इतकी अमानुष आहे की त्यांच्या पाठीवरची चामडी सोलून निघाली असुन शरीरावर सर्वत्र व्रण उमटले आहेत. अतिशय निर्दयीपणे ही मारहाण करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

### शेतकरी कर्जमाफीच्या

ठरली असल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

यासोबतच २०२५ मध्ये बीड जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री यांनी शेतकऱ्यांना सरसकट पीकविमा देण्याची घोषणा केली होती. मात्र अद्यापही त्या घोषणेची अंमलबजावणी झालेली नाही. बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७,५०० रुपये पीकविमा सरसकट देण्यात यावा, अशी मागणीही थावरे यांनी केली. या पार्श्वभूमीवर मोठेवाडी (ता. माजलगाव) येथे १२ जून २०२६ रोजी गावातून शेतकऱ्यांची रॅली काढण्यात येणार असून मुख्य चौकात कर्जमाफीच्या शासन निर्णयाची प्रतीकात्मक होळी करण्यात येणार आहे असे भाई थावरे यांनी म्हटले आहे.

### अवैध वाळु वाहतुक बनावट

असुन पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई चेतना तिडके मॅडम प्रभारी पोलीस अधीक्षक बीड, ऋषीकेश शिंदे, सहाय्यक पोलीस अधीक्षक अंबाजोगाई अतिरीक्त पदभार उपविभाग माजलगाव यांच्या मार्गदर्शनाखालील पोलीस निरीक्षक राहुल सुर्यतळ, पोलीस उपनिरीक्षक केरबा माकणे, पोलीस उपनिरीक्षक/संदीप राठोड,पो.कॉ. महादेव बहिरवाळ, पो.कॉ.सुनिल गवळी यांनी केली आहे.

## शेतकऱ्याच्या जमिनीवर बेकायदा रस्ता टाकल्याचा गंभीर आरोप; महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

**आष्टी, प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनीत विनापरवानगी, विनानोटीस आणि विनासंमती रस्त्याचे काम सुरू करण्यात आल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, या प्रकरणामुळे महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संबंधित शेतकऱ्याने तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून बेकायदेशीर मंजुरी रद्द करण्याची तसेच दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.**

मौजे आष्टी येथील शेतकरी शिवलिंग यशवंतराव लगड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांच्या मालकीच्या शेतजमिनीलगत रोजगार हमी योजनेअंतर्गत रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. विशेष म्हणजे संबंधित व्यक्तीस पूर्वापार रस्ता उपलब्ध असतानाही नव्याने रस्ता मंजूर करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यामुळे शासनाच्या निधीचा अपव्यय होत असल्याबरोबरच एका शेतकऱ्याच्या मालकी हक्कावर गदा आणण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या मालकीच्या जमिनीच्या हद्दीपासून अवघ्या काही अंतरावर सुमारे २००० फूट लांबीच्या रस्त्यासाठी दगड व खडी टाकून सपाटीकरणाचे काम करण्यात येत आहे. या कामामुळे त्यांच्या शेतीचे दोन तुकडे होण्याची शक्यता असून भविष्यात शेती करणे कठीण होणार आहे. लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान होणार असून उपजीविकेचे साधन धोक्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

सर्वात धक्कादायक बाब म्हणजे संबंधित काम सुरू करण्यापूर्वी कोणतीही नोटीस देण्यात आली नाही, हरकती मागविण्यात आल्या नाहीत किंवा जमीनधारकाची संमतीही घेण्यात आली नसल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण नियमबाह्य आणि संशयास्पद असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

शेतकरी शिवलिंग लगड यांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात बेकायदेशीर रस्त्याचे काम तात्काळ थांबविणे, मंजुरी आदेश रद्द करणे, घटनास्थळी पंचनामा करून चौकशी करणे तसेच या प्रकरणातील जबाबदार अधिकारी आणि संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, एका शेतकऱ्याच्या मालकी हक्कावर गदा आणून विकासकामांच्या नावाखाली मनमानी सुरू असल्याचा आरोप होत असून महसूल विभागाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अन्यथा न्यायासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही संबंधित शेतकऱ्यांनी दिला आहे.

## डॉ. शशिकांत टेकाडे यांची संभाजीनगर ग्रामीण डॉक्टर सेल अध्यक्षपदी निवड

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्याचे भूमिपुत्र तथा सध्या बिडकीन (ता. पैठण) येथे वैद्यकीय सेवा बजावत असलेले डॉ. शशिकांत टेकाडे यांची शिवसेना (एकनाथ शिंदे गट) संभाजीनगर ग्रामीण डॉक्टर सेलच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. खासदार संदीपान भुमरे आणि आमदार विलास भुमरे यांच्या आदेशानुसार ही निवड जाहीर करण्यात आली.



स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन डॉ. शशिकांत टेकाडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून वैद्यकीय सेवेसोबतच सामाजिक आणि संघटनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. बिडकीन, कृष्णापूर तसेच संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात त्यांनी एक अभ्यासू, सेवाभावी आणि सर्वसामान्यांच्या मदतीला धावून जाणारा शिवसैनिक अशी ओळख निर्माण केली आहे.

आरोग्य क्षेत्रातील योगदानाबरोबरच समाजातील विविध घटकांशी सातत्याने संपर्क ठेवत जनसेवेचे कार्य करणाऱ्या डॉ. टेकाडे यांच्या कार्याची दखल घेत शिवसेना नेतृत्वाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपविली आहे. त्यांच्या निवडीमुळे संभाजीनगर ग्रामीण भागातील डॉक्टरांचे प्रश्न, आरोग्यविषयक उपक्रम आणि जनजागृती मोहिमांना अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. डॉ. टेकाडे हे जरी सध्या संभाजीनगर जिल्ह्यात कार्यरत असले तरी त्यांची मूळ ओळख आष्टी तालुक्याचे भूमिपुत्र अशीच आहे. त्यामुळे त्यांच्या या निवडीमुळे आष्टी तालुक्यातही आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पीक विमा मिळाला नाही? आता होणार चौकशी; कृषिमंत्र्याचा मोठा आदेश

## लवकरच मिळणार नुकसान भरपाई


पुंणे : पीक विमा भरपाईपासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची आता शासनस्तरावर दखल घेण्यात आली आहे. खरीप व रब्बी हंगाम २०२३-२४ तसेच खरीप २०२४-२५ मधील पीक विमा प्रकरणांची तपासणी करून अहवाल सादर करण्याचे आदेश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला दिले आहेत. विमा कंपनीच्या कार्यपद्धतीसह नुकसानभरपाई प्रक्रियेतील त्रुटींची चौकशी होणार असून, शेतकऱ्यांना मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, असे निर्देश देण्यात आले आहेत.

अकोला जिल्ह्यातील खरीप व रब्बी हंगामातील पीक विमा भरपाईबाबत आलेल्या तक्रारींची गंभीर दखल घेत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी प्रशासनाला चौकशी करून तपासणी अहवाल शासनाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच या प्रकरणात विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेल्या बैठकींचे इतिवृत्तही मागविण्यात आले आहे. खरीप व रब्बी हंगाम २०२३-२४ तसेच खरीप हंगाम २०२४-२५ मधील पीक विमा नुकसानभरपाई मिळण्याबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या पार्श्वभूमीवर मंत्रालयात आयोजित बैठकीत



कृषिमंत्र्यांनी विमा कंपनीची कार्यपद्धती, नुकसान भरपाई प्रक्रियेतील त्रुटी आणि शेतकऱ्यांचे आक्षेप यांची तपासणी करण्याचे आदेश दिले. पीक विमा योजनेतील काही निकषांमुळे अनेक शेतकरी विमा लाभापासून वंचित राहत असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. नुकसान झाले असूनही काही तांत्रिक अडचणी आणि निकषांमुळे भरपाई मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकरी प्रतिनिधींनी मांडल्या. कृषिमंत्र्यांनी प्रशासनाला निर्देश देताना सांगितले की, पीक विमा प्रक्रियेतील त्रुटींची सखोल तपासणी करून कोणत्याही परिस्थितीत आपदग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाहीत, याची काळजी घ्यावी. खरीप व रब्बी हंगामातील पीक विमा भरपाई प्रक्रियेत सहभागी असलेल्या एचडीएफसी ॲग्रो इन्श्युरन्स कंपनीच्या कामकाजाचीही तपासणी करण्यात येणार आहे. नुकसान भरपाई निश्चित करताना कोणते निकष वापरण्यात आले, शेतकऱ्यांच्या तक्रारींची दखल कशी घेतली गेली आणि भरपाईपासून शेतकरी का वंचित राहिले, याचा अहवाल तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणात आतापर्यंत विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर झालेल्या बैठकांचे इतिवृत्त आणि निर्णयांचा अहवाल शासनाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तक्रारींचे स्वरूप, प्रशासनाची भूमिका आणि विमा कंपनीकडून झालेली कार्यवाही याचा आढावा घेऊन शेतकरी हिताचा निर्णय घेण्याचे निर्देश कृषिमंत्र्यांनी दिले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना तीन दिवसांत पीक कापणी अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या अहवालाच्या आधारे पीक विमा नुकसानभरपाईबाबत पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

## 'कांकरेज गाय', जाणून घ्या वैशिष्ट्ये!



काही गायीच्या जाती एवढ्या लोभस असतात की बघताक्षणीच त्या आकर्षित करतात. अशीच गायीची एक जात म्हणजे 'कांकरेज गाय'. दूध उत्पादन व शेतकाम अशा दुहेरी कामासाठी या जातीची गाय आणि बैल उपयुक्त ठरतो. जाणून घेऊ या जातीविषयी अधिक माहिती. उगम : या जातीच्या गायी प्रामुख्याने गुजरातच्या कच्छ रण आणि राजस्थान मध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात.

शारीरिक वैशिष्ट्ये : या गायीचा रंग सिल्व्हर राखाडी किंवा स्टील राखाडी असतो. त्यांची शिंगे लांब आणि दिसायला मजबूत, तीक्ष्ण आणि वीणेच्या आकाराची असतात, जी कोणालाही सहजपणे दुखवू शकतात. या गायीची उंची सुमारे १२५ सेमी आहे, तर बैलांची उंची १५८ सेमी आहे. कांकरेज गायीचे वजन ३२० ते ३७० किलो पर्यंत असते. पूर्ण वाढ झालेल्या बैलाचे वजन ५०० ते ५५० कि.ग्रॅ असते. प्रजोत्पादन आणि दूध उत्पादन : या गायीचे प्रथम माजावर येण्याचे वय सुमारे ३० ते ३६ महिने एवढे असते. या गायींचा दूध देण्याचा कालावधी २७० ते ३०० दिवस असून, एका वेतात १७५० ते १८०० लिटर दूध देतात. दिवसाकाठी सर्वसाधारण ६ ते ७ लिटर दूध सहज देतात. या गायीचे सरासरी आयुष्य २० ते २२ वर्ष असते. इतर वैशिष्ट्ये : भारतीय गायीमधील प्रथम बघताचक्षणी प्रेमात पडावे असा लोभस गोवंश म्हणजे कांकरेज गोवंश होय. ह्या गायीने त्याच्या अंगच्या गुणवत्तेने परदेशीयांना सुद्धा संशोधन करण्यास भाग पाडले आहे. आर्यांनी ज्यावेळी आक्रमण केले त्यावेळी त्यांच्या बरोबर असलेला गोवंश म्हणून या गायीची नोंद आहे. कमी पावसाच्या प्रदेशात निकृष्ट अन्नावर पोषण होऊन देखील उत्तम गुणवत्ता सिद्ध करणे हे या गायीचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. सरकारने या गायीचे महत्त्व जाणून पोस्टाचे रु. ३/- चे टपालाचे तिकीट काढले आहे.

## तुरीचे वाण निवडताना घ्या विशेष काळजी

तूर पिकाचे भरघोस उत्पादन घेण्यासाठी जमिनीच्या प्रकारनुसार आणि पर्जन्यमानाप्रमाणे योग्य वाणांची निवड करणे आवश्यक असते. यंदा सांगितलेल्या कमी पावसाच्या शक्यतेमुळे कमी ते मध्यम कालावधीत परिपक्व होणाऱ्या वाणांची शिफारस केली जात आहे. या वाणांमुळे वातावरणातील जोखीम कमी होऊन चांगले उत्पादन शेतकरी घेऊ शकतात.



आय.सी.पी.एल. ८७ (प्रगती) : हे वाण हैद्राबाद येथील आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्रातून १९८६ मध्ये प्रसारित करण्यात आले आहे. हे वाण दुबार पिकासाठीसाठी योग्य आहे. तसेच पहिल्या बहाराच्या शेंगा तोडून दुसरा बहार घेता येतो. या वाणाचे दाणे मध्यम टपोरे असून या वाणाचे सरासरी ९ ते १० क्विंटल प्रति हेक्टर उत्पादन मिळते व वाण १२५ ते १३५ दिवसात परिपक्व होते.

ए.के.टी. ८८११ : हे वाण १४० ते १५० दिवसात तयार होते तसेच ते मर रोगासाठी मध्यम प्रतिकारक आहे. या वाणाचे सरासरी उत्पादन १० ते ११ क्विंटल प्रति हेक्टर मिळते. या वाणाच्या दाण्याचा रंग लाल उसून १०० दाण्याचे वजन सुमारे ९.०० ग्रॅम इतके आहे. बी.डी.एन. ७०८ : हा वाण कमी पावसाच्या (५५० ते ६५० मिमी पाऊस) भागासाठी योग्य आहे. हे वाण १६० ते १६५ दिवसात परिपक्व होत असून या वाणाचे उत्पादन सरासरी १६ ते १८ क्विंटल प्रति हेक्टर इतके मिळते. या वाणाच्या शेंगा गर्द लाल असून दाणे देखील चमकदार लाल रंगाचे आहेत. हा वाण मर आणि वांझ रोगाला प्रतिबंधक आहे तसेच शेंगा पोखरणाऱ्या किडींना सहनशील आहे. फुले राजेश्वरी : हे वाण १४० ते १५० दिवसात तयार होत असून त्यापासून हेक्टरी सरासरी २२ क्विंटल उत्पादन मिळते. तसंच हे मर आणि वांझ रोगासाठी प्रतिकारक्षम असते. हे वाण कडधान्य सुधार प्रकल्पाच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाने २०१२ रोजी प्रसारित केले आहे.गोदावरी : हा वाण कृषि संशोधन केंद्र बदनापूर द्वारे २०२१ मध्ये प्रसारित करण्यात आला. या वाणाची फुले मळकट पांढरी असतात आणि दाण्याचा रंगसुद्धा पांढरा असतो. या वाणाचा परिपक्वतेचा कालावधी सुमारे १६० ते १६५ दिवस असून हेक्टरी उत्पादन सरासरी १९ ते २४ क्विंटल इतके मिळते. आय.पी.ए. १५-०६ : हे वाण भारतीय कडधान्य संशोधन संस्था कानपूर इथून मध्य भारतात खरीप लागवडीसाठी २०२१मध्ये प्रसारित करण्यात आला. या वाणाचा कालावधी १४० ते १५० दिवसात पूर्ण होत असून या वाणाचे हेक्टरी सरासरी उत्पादन १८ ते २० क्विंटल उत्पादन मिळतं. हे वाण मर रोगासाठी प्रतिबंध करते. फुले तृप्ती : मध्यम कालावधीचा हा वाण महात्मा फुले कृषि विद्यापीठाने महाराष्ट्र, गुजरा, मध्य प्रदेश, छत्तीसगड या भागांसाठी २०२२ मध्ये प्रसारित करण्यात आला. हा वाण १६७ ते १६९ दिवसांमध्ये परिपक्व होतो. या वाणाचे सरासरी उत्पादन २२ ते २३ क्विंटल इतके मिळते. मर आणि वांझ रोगासाठी हा मध्यम प्रतिकारक आहे. तसंच शेंगमाशी आणि शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठीसुद्धा मध्यम प्रतिकार आहेत. बी.डी. एन. पी. एच. २०१८-०५ : हा वाण २०२४ साली संकरित वाण कृषि संशोधन केंद्र येथून मध्य भारतासाठी प्रसारित करण्यात आला आहे. हा वाण १५५ ते १६० दिवसात म्हणजे मध्यम कालावधीत परिपक्व होतो. या वाणाचे उत्पादन सरासरी १८ ते २२ क्विंटल प्रति हेक्टर इतके मिळते. मर रोगासाठी प्रतिबंध आणि वांझ रोगास मध्यम प्रतिकारक्षम आहे. फुले पल्लवी : हे वाण १५५ ते १६० दिवसात परिपक्व होऊ त्यापासून हेक्टरी सरासरी २१ ते २२ क्विंटल उत्पादन मिळते. हे वाण मर आणि वांझ रोगासाठी मध्यम प्रतिकारक आहे. तसेच शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडींचा प्रादुर्भाव कमी आढळतो. या वाणाचे दाणे अंडाकृती तपकिरी रंगाचे असतात.

## संत्रा लागवड; कलमांची निवड आणि काळजी

संत्रा कलमांची लागवड पावसाळा सुरू होताना करणे उत्तम असते. एक पाऊस पडून गेल्यानंतर आणि पुढे ढगाळ हवामानाचा काळ सुरू झाल्यानंतर संत्रा कलमांची लागवड करावी. पावसाळा संपताना किंवा संपून गेल्यानंतर लागवड करणे टाळावे. संत्रा लागवड करण्याआधी संत्राच्या कलमांची निवड करणं आवश्यक असते.

कलमांची निवड : कलमे कृषी विद्यापीठ, शासकीय परवानाधारक रोपवाटिकेतूनच घ्याव्यात. योग्य खुंट व योग्य प्रकारचा डोळा यांच्या खात्री येत असते. कलमे निरोगी, जास्त उत्पादन व दर्जेदार फळे देणाऱ्या मातृ वृक्षाचे डोळे वापरूनच तयार केलेली असली पाहिजेत. संत्र्याच्या कलमा किकरपानी, वेलिया किंवा पानसोट असलेल्या मातृ वृक्षापासून तयार केलेली नसावीत. कलमांची निवड करताना संत्र्याचा डोळा कोणत्या खुंटावर बांधलेला आहे हे पाहावे. कारण खुंटाचा, झाडाची शारीरिक वाढ, फळधारणाशक्ती, फळांचे गुणधर्म आणि झाडाचे आयुष्य यावर परिणाम पडत असतो. हलक्या व मध्यम जमिनीसाठी जबेरी तर भारी जमिनीसाठी रंगपूर लिंबू या खुंटावरील कलमांची निवड करावी. जबेरी किंवा रंगपूर लिंबू या खुंटावर २५ ते ३० सेंमी उंचीवर बांधलेल्या कलमा निवडाव्यात. कमी उंचीवर बांधणी केलेल्या कलमा मातीच्या आणि पाण्याच्या संपर्कात येऊन बुरशीजन्य रोगास बळी पडत असतात. कलमांचे फाटे परिपक्व झालेले असणे आवश्यक आहे. फाट्यावर पांढऱ्या बारीक रेषा असल्या तर फाटे



परिपक्व झाले असे समजावे. साधारण ४५ ते ६० सेंमीपर्यंत सरळ वाढलेल्या कलम चांगल्या असतात. अति उंच कलम लागवडीसाठी वापरू नयेत. त्या कलम वेलीया प्रकारच्या असण्याची शक्यता असते.लागवड करताना घ्यावयाची काळजी : जमिनीतून कलमे काढताना आदल्या दिवशी त्यास भरपूर पाणी द्यावे. ढगाळ वातावरण असताना कलमा रोपवाटिकेतून काढणे फायदेशीर असते. कलमे काढताना तंतुमय मुळांना कमीत कमी इजा होईल याची काळजी घ्यावी. शक्यतो कलमे 'डिगिंग फॉर्क'ने काढाव्यात. कलमा सबलीने काढू नयेत. सबलीने कलमा काढल्यामुळे सोटमूळ आणि तंतुमय मुळे तुटण्याची शक्यता असते. कलमा काढल्यानंतर सोट मुळाचा शेवटचा भाग आणि इजा झालेली मुळे सिकेटरने काळजीपूर्वक छाटून टाकावीत. कलमांची शेंड्याकडील कोवळी पानेसुद्धा काढून टाकावीत. फक्त परिपक्व पाने ठेवावीत. मुळांची संख्या आणि पानांच्या संख्येचे योग्य प्रमाण असावे. कारण काढणीच्या वेळी काही मुळ्या तुटतात. सर्व पाने ठेवली गेल्यास त्यांचे पोषण व्यवस्थित होत नाही. परिणामी रोपे दगाविण्याचा धोका जास्त असतो. पॅकिंग करताना कलमांच्या मुळांना इजा होऊ न देता ओल्या मातीत गुंडाळून सभोवती तरटाने घट्ट बांधून तो भाग पाण्याने ओला करावा. त्यानंतर लागवडीच्या जागी लवकरात लवकर कलम आणावीत. कलमा लागवडीपूर्वी सावलीत ठेवाव्यात. पॅकिंगच्या मुळाचा भाग थोडा वेळ पाण्यात बुडवून काढावा किंवा त्यावर पाणी शिंपडावे. कलम जमिनीत लावण्यापूर्वी त्यांची मुळे ३ ग्रॅम कॉपर ऑक्सिक्लोराइड प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात बुडवून लावावीत. कलमा लागवडीपूर्वी खड्डे शेणखत अधिक माती (२:१) आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेटने भरून ठेवलेले असावेत. कलमे खड्ड्याच्या मध्यभागी जमिनीत लावावीत. कलम लावताना मुळे स्वाभाविक अवस्थेमध्ये ठेवावीत. नंतर मुळांचा मातीबरोबर घनिष्ठ संबंध यावा, यासाठी माती घट्ट दाबावी. लागवडीच्या वेळी कलमे एका ओळीत येण्यासाठी झाडे लावण्याचा तक्त्याचा वापर करावा. लागवड शक्यतो रिमझिम पाऊस सुरू असताना करावी. लागवड पूर्ण झाल्यानंतर पाऊस न आल्यास लगेच पाणी द्यावे. दुसऱ्या दिवशी वाफसा आल्यावर प्रत्येक कलमाच्या चहूबाजूंनी माती घट्ट दाबून घ्यावी. कलमांचे वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी त्यांना बांबूच्या काठीचा आधार द्यावा. पाऊस नसल्यास दर तीन दिवसांनी कलमांना पाणी द्यावे. कलमांना नवीन जोमदार फुटवे आल्यावरच रासायनिक खतांची मात्रा द्यावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.
१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.
१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.
१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.
१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.
१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.
१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.
१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.
१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.
१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.
१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.
१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.
१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.
१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.
१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.
१९८७ : १६० वर्षांच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.
२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.
२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.
२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)
१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.
१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)
१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.
१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तूपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.
१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.
१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.
१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.
१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.
१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.
१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३इ.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)
१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)
१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)
१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)
१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.
१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)
१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)
२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय कॉंग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# मोदी सरकारमध्ये १२ वर्षात ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य

## ४ कोटी घरे, १० कोटी उज्ज्वला गॅस जोडण्या;भारताची विकसित राष्ट्र बनण्याकडे वेगवान वाटचाल - आ. लोणीकर

जालना। प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या बारा वर्षांत भारताने विकासाच्या प्रत्येक क्षेत्रात ऐतिहासिक झेप घेतली आहे. २०१४ मध्ये ''सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास'' या मंत्राने सुरू झालेली वाटचाल आज विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे वेगाने पुढे जात आहे. केंद्र सरकारने गरीब, महिला, युवा आणि शेतकरी या चार प्रमुख घटकांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून धोरणे राबवली. प्रशासनात पारदर्शकता, निर्णयक्षम नेतृत्व, भ्रष्टाचारमुक्त कारभार आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे जनतेचा शासनावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. आज भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनला असून जागतिक पटलावर भारताचा प्रभाव सातत्याने वाढत आहे. जी-२० अध्यक्षपदाचे यशस्वी नेतृत्व, चांद्रयान मोहिमेचे यश, संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरता आणि वाढती परकीय गुंतवणूक यामुळे भारताला नवी ओळख मिळाली आहे. असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी पत्रकार परिषद मध्ये बोलतानी केले.



केंद्रातील मोदी सरकारला १२ वर्षे पूर्ण झाल्या निमित्त आयोजन पत्रकार परिषदे दरम्यान आमदार बबनराव लोणीकर बोलत होते. यावेळी आ.नारायण कुचे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, अशोक पांगारकर, अक्षय गोरंट्याल, जिल्हा सरचिटणीस अनिल कोलते, महेश निकम, शशिकांत घुगे, जीवन सले, सुजित जोगस, शिवराज नारियलवाले यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री लोणीकर म्हणाले की, देशातील महत्त्वाच्या राजकीय आणि सामाजिक निर्णयांमध्ये राम मंदिर उभारणी, कलम ३७० हटविणे आणि तीन तलाक कायदा रद्द करणे या मुद्द्यांना विशेष स्थान मिळाले आहे. अयोध्येत राम मंदिर उभारणीचे स्वप्न प्रत्यक्षात आल्याने अनेक भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करून केंद्र सरकारने राज्याच्या प्रशासकीय रचनेत मोठा बदल केला. तसेच मुस्लिम महिलांना तिहेरी तलाकपासून संरक्षण मिळावे यासाठी तीन तलाकविरोधी कायदा लागू करण्यात आला. या निर्णयांना सरकारने सामाजिक न्याय, विकास आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल म्हटले आहे. या विषयांवर देशभरात विविध स्तरांवर चर्चा आणि प्रतिक्रिया उमटल्या असून ते अलीकडच्या काळातील महत्त्वाचे राजकीय निर्णय मानले जातात असेही आमदार बबनराव लोणीकर म्हणाले.

गरीब कल्याणाच्या क्षेत्रात मोदी सरकारने अनेक ऐतिहासिक निर्णय घेतले. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे देशातील ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य उपलब्ध करून देण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ४ कोटींहून अधिक पक्की घरे बांधण्यात आली असून लाखो कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण झाले आहे. जनधन योजनेमुळे ५५ कोटींहून अधिक बँक खाती उघडली गेली आणि आर्थिक समावेशनाला गती मिळाली. उज्ज्वला योजनेतून १० कोटी ३३ लाख महिलांना मोफत गॅस जोडणी मिळाली. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ४४ कोटी लाभार्थ्यांना दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंत आरोग्य संरक्षण मिळत आहे. या योजनांमुळे देशातील गरीब कुटुंबांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा झाल्याचे चित्र दिसून येत आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले. विश्वास, विकास आणि जनकल्याण'' या त्रिसूत्रीच्या बळावर भारत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र सरकार यांनी राबविलेल्या विविध योजनांमुळे देश, राज्य आणि जालना जिल्ह्याच्या विकासाला नवी गती मिळाली आहे. विकसित महाराष्ट्र हेच विकसित भारताचे मजबूत पाऊल असून २०४७ पर्यंत भारताला जगातील अग्रगण्य विकसित राष्ट्र बनविण्याच्या संकल्पपूर्तीसाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

जालना जिल्ह्यात २०१४ ते २०२६ या कालावधीत केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांमधून मोठ्या प्रमाणावर विकासकामे झाली आहेत. जालनाजळगाव रेल्वेमार्गासाठी ७,१०६ कोटी रुपये, जालना ड्राय पोर्टसाठी ३२७ कोटी रुपये, समृद्धी महामार्गातील जालना भागासाठी सुमारे ४ हजार कोटी रुपये आणि शेगावपंढरपूर राष्ट्रीय महामार्गासाठी सुमारे ५५० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. याशिवाय जालनाभोकरदनसिल्लोड, पाथरीआष्टीघनसावंगीअंबडपैठण आणि इतर महत्त्वाच्या रस्त्यांच्या विकासामुळे जिल्ह्यातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम झाली आहे. जालना जिल्हा आता मराठवाड्यातील महत्त्वाचे औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स केंद्र बनत आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. जलजीवन मिशन, १७३ गाव वॉटर ग्रिड, ९५ गाव वॉटर ग्रिड, १२० गाव सुधारित पाणीपुरवठा योजना, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पीएम किसान, नमो शेतकरी, प्रधानमंत्री आवास योजना, ग्रामसडक योजना, लाडकी बहीण योजना आणि विविध सामाजिक न्याय योजनांमुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली आहे. ४ लाखांपेक्षा अधिक घरकुल मंजुरीमुळे हजारो कुटुंबांचे पक्क्या घराचे स्वप्न साकार होत आहे. महिला, शेतकरी, युवक, विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना या योजनांचा थेट लाभ मिळत आहे. विविध योजनांचा एकत्रित विचार करता जालना जिल्ह्यात २०१४ ते २०२६ या कालावधीत ५० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक विकास गुंतवणूक झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. ही गुंतवणूक जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

## फुले मार्केट प्रश्न मार्गी लावा अन्यथा व्यापाऱ्यांचा सहनशीलतेचा अंत पाहू नका - हस्तीमल बंब



जालना। प्रतिनिधी


आपले लहान-सहान जनरल मर्चन्टस्? व्यवसाय करणारे अधिकांश व्यापाऱ्यांचे दुकाने फुले मार्केट येथे होते. मगील १५ वर्षापूर्वी जालना शहराच्या मध्यभागी वीर सावरकर चौक, व्यापारी बाजार पेठ येथील महात्मा फुले मार्केट शासना तर्फे पाडण्यात आले होते. त्यावेळी आश्वासन देण्यात आले होते कि, लवकरात लवकर सोई-सुविधा युक्त मार्केट बांधुन जुने गाळाधारकांना दुकाने देण्यात येईल. त्यानंतर अनेक निवडणुका पार पडल्या पालिकाकडून, शासना तर्फे लोक प्रतिनिधी, मुख्यमंत्री यांच्या पर्यंत अनेक वेळा निवेदन देण्यात आले. आता पर्यंत फक्त आश्वासनच मिळाले. व्यापाऱ्यांचे संसार रस्त्यावर आले आहे, हे त्यांच्या रोजी-रोटीचे प्रश्न आहे. ह्यामुळे व्यापारी वर्गात संतापाची लाट उभरुन आली आहे. फुले मार्केट उभारणीचा प्रश्न जालन्यासाठी दुर्दैवी आहे, अस बंब म्हणाले. जनरल मर्चन्टस्? असोसिएशन जिल्हा कार्यकारणीची बैठक हॉटेल सात्विक भोजच्या सभागृहात दि. १० जून २०२६ बुधवार रोजी जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी राज्य उपाध्यक्ष सतिष पंच, मराठवाडा विभागीय सचिव सुखदेव बजाज, गोविंद साखला, संदीप काबरा, माजी अध्यक्ष शिवाजी तनपुरे मंचावर वर उपस्थित होते. प्रारंभी श्री काबरा यांनी मागील बैठकीचे वृतांत सादर केले. कोषाध्यक्ष सुदर्शन चिप्पा यांनी आवक जावक हिसोब सादर करुन आपली संघटना नोंदणीकृत असल्यामुळे संस्थेचे हिसोब ऑडीट करुन धर्मादाय आयुक्ताकडे सादर करण्यात आले आहे. पुढे बोलताना बंब म्हणाले आपल्या संस्थेला ५० वर्ष पूर्ण झाल्या मुळे आपण सुर्वण महोत्सवी वर्ष आयोजित केला होता. केमिस्ट नंतर आपली एकमेव संघटना आहे. जिल्ह्यातील सर्व तालुक्यात ग्रामीण भागात व्यापाऱ्यांची संघटना उभारण्यात आली आहे. लवकरच जिल्हा अधिवेशन घेण्यात येईल. फुले मार्केट उभारणीसाठी अनेक वेळा पाठपुरावा करुन ही प्रश्न मार्गी लागलेला नाही, त्यामुळे त्या जागेवर घाणीचे साम्रज्य पसरलेले आहे, अतिक्रमण सुद्धा वाढत आहे. तसेच अवैध धंद्यांना वाव मिळत आहे. हा विषय फक्त व्यापाऱ्या पुरता नसुन जालना शहराच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. शासनानी व्यापाऱ्यांच्या सहनशिलतेचा अंत पाहु नका अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करावे लागेल. पालिके ने शहरात मुत्र्या बांधलेली आहे पण तेथे पाणी व सुविधा नसल्यामुळे लोक उघड्यावर शौचालय करतात. पालिकेने योग्य जागा दिल्यास अत्याधुनिक सुलभ शौचालय उभारू. सर्व लहान सहान व्यापाऱ्यांना संघटनेत समाविष्ट करून सदस्यता अभियान राबू, अस बंब म्हणाले. श्री पंच, श्री बजाज यांनी आपले विचार मांडले. यावेळी सदस्यता अभियानाचे पत्रक वितरण करण्यात आले. या बैठकीच्या यशस्वितेसाठी जगदीश अग्रवाल, रवि वनवारी, संतोष मुंदडा, पुरुषोत्तम सोसे, अब्बास खाँ, संतोष मोरे इ. परिश्रम घेतले. बैठकीचे सुत्र संचालन देवेन्द्र सावजी यांनी केले, तर आभार संतोष मोरे यांनी मांडले.

## किर्तनवाडी व भारजवाडी येथे सशस्त्र दरोडा चोरट्यांकडून कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला !

### खरवंडी का.परिसरातील चोऱ्याचे सत्र आणि गुन्हेगारीला आळा बसवण्यासाठी शुक्रवारी खरवंडी बाजार पेठ बंद!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील कीर्तनवाडी येथील रावसाहेब बाजीराव कीर्तने आणि भारजवाडी येथे शेतकरी बाबासाहेब दशरथ बटुळे या दोन शेतकऱ्यांच्या घरी चोरट्यांनी बुधवारी मध्यरात्री सशस्त्र दरोडा टाकून सोने व रोख रक्कम मिळून सहा ते सात लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला असून चोरट्यांनी दरोडा टाकण्यासाठी पिस्टल रॉड चाकू अन्य लोखंडी धारदार शस्त्रांनी जीवघेणा हल्ला करून मारहाण केली यामध्ये रावसाहेब बाजीराव कीर्तने हे जखमी झाले त्यांना पाथर्डी येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले बुधवारी मध्यरात्री पोलिसांना घटनेची माहिती समजताच पोलीस अधीक्षक ममुका सुदर्शन अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कुलबर्ग पोलीस उपअधीक्षक नीरज राजगुरू पोलीस निरीक्षक विलास पुजारी व अन्य पोलीस कर्मचाऱ्यांसह श्वानपथक व ठसे घेणारे पथक हे घटनास्थळी पोहोचले पोलिसांनी




सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या माध्यमातून दरोडा टाकणाऱ्या टोळीची माहिती घेण्यास सुरुवात केली असून दरोडा टाकणाऱ्या टोळीला पकडण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत खरवंडी कासार परिसरात वाढती गुन्हेगारी चोऱ्यांचे सत्र अन्य वाढत्या गुन्हेगारीला आळा बसवण्यासाठी शुक्रवार १२ जून २०२६ या दिवशी खरवंडी कासार बाजार पेठ बंद ठेवण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे खरवंडी कासार परिसर गेल्या काही महिन्यांमध्ये दहशतीखाली वावरत असून या परिसरामध्ये वाढती गुन्हेगारी चोऱ्यांचे सत्र व युवकांमध्ये वाढत चाललेली गुन्हेगारी प्रवृत्ती याला आळा बसवण्यासाठी खरवंडी कासार पोलीस चौकी २४ तास कार्यान्वित करणे दोन पीएसआय व सात ते आठ पोलीस कॉन्स्टेबल खरवंडी कासार पोलीस चौकीत २४ तास उपलब्ध करून देण्यात यावेत खरवंडी कासार या ठिकाणी स्वतंत्र पोलीस स्टेशन मंजूर करण्यात यावे या मागण्यासाठी गुरुवारी दिनांक १२ जून २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता खरवंडी कासार उपनगर बंद ठेवण्यात येणार आहे यावरती आळा बसला नाही तर पुढे चालून मोठे जनआंदोलन उभे करू असा इशारा खरवंडी परिसराच्या वतीने आजिनाथ कीर्तने व किसन आव्हाड यांनी दिला असून याबाबतचे निवेदन पोलिसांना दिले आहे.

### खरवंडी कासार उपनगर बनले क्राईम हब?

गेल्या काही महिन्यांमध्ये खरवंडी कासार व परिसरातील वाड्या वस्ती तांड्या व पाड्यांवर शेतकऱ्यावर प्राणघातक हल्ले करून सशस्त्र दरोडा टाकण्याच्या घटना घडल्या असून अद्याप पर्यंत कुठल्याही चोरीचा तपास व दरोडा टाकणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात पोलिसांना अपयश आले असून खरवंडी कासार परिसरात प्रत्येक वाड्या वस्त्या तांड्या व पाड्यावर पाच ते दहा १८ ते २० वयोगटातील युवक गावठी कट्ट्यासह गुन्हेगारी क्षेत्राकडे वळल्याचे निष्पन्न झाले आहे गोपनीय माहितीनुसार खरवंडी कासार परिसरात ३० ते ३५ गावठी कट्टे व पिस्टल आहेत खरवंडी कासार परिसर गेल्या काही महिन्यांमध्ये प्रचंड दहशतीखाली व भीतीखाली वावरत असून तातडीने या चोऱ्यांचा व गुन्हेगारी पर्वाचा समूळ नायनाट करण्याची मागणी सर्वसामान्य नागरिकांमधून करण्यात येत आहे.

## शिवाजी घुले यांच्या नेतृत्वाने सकल मातंग समाजाचे धरणे आंदोलन

### मागणीची दखल न घेतल्यास महाराष्ट्रात तीव्र आंदोलन उभारले जाईल-मातंग समाज

अंबड। प्रतिनिधी

तालुक्यातील सकल मातंग समाजाच व महिला भगिनी एकत्रित येऊन आज गुरुवार दि.११ जुलै रोजी सकाळी ११वाजेपासून अंबड तहसील कार्यालयासमोर अनुसूचित जातीच्या अ ब क ड उपवर्गीकरणासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी मोठ्या प्रमाणात मातंग समाज एकवटला होता. महिला देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी अद्याप राज्य सरकारने न केल्यामुळे राज्यातील मातंग



समाज आक्रमक झाला असून राज्यात ठिकठिकाणी धरणे आंदोलने व उपोषणे चालू असून त्याच पार्श्वभूमीवर अंबड तालुक्यातील असंख्य सकल मातंग समाज व महिला आज गुरुवारी सकाळी ११ वाजेपासून तहसील कार्यालयासमोर आक्रमक होऊन मोठी घोषणाबाजी करत धरणे आंदोलनाल केले. आंदोलन स्थळी पोलीस उपनिरीक्षक आदिनाथ ढाकणे, रामेश्वर मुळक व इतर पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त होता.या आंदोलनात मातंग समाज संघटनेचे नेते शिवाजी घुले, मातंग समाजाचे ज्येष्ठ नेते भारत जाधव, सतीश सोनवणे, राजेंद्र सोनवणे ,सुमंता शिंदे, राम पवळे, कुमार गुडेकर, भीवराज सकट, दानियल निर्मळ, शाळीग्राम हंगारगे, मंगलसोनवणे,वंदना गवळी माया गवळी, राजू जाधव या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील काळुंके यांनी केले यांच्यासह तालुक्यातील असंख्य मातंग समाजाचे या आंदोलन सहभागी झाले होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-५४६
दिनांक - १०/०६/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती राजु हिरामन कातुरे रा. हस्त पोखरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या चुलत भाऊ जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पंढरीनाथ केरुबा कातुरे | चुलत भाऊ | ०१/०१/१९६६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, आष्टी यांचे कार्यालय (दंड - विभाग )**

ता. आष्टी जि. बीड
Email id-tahsildarashti@gmail.com
दूरध्वनी. क्र.. (०२४४१) २८२५४२
क्र.२०२६/दंड. विभाग/जन्म-मृत्यू/कावी-
दि.०२/०६/२०२६

**जाहीरनामा**

**जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

जन्म आणि मृत्यू ची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११(३) अन्वये सर्व जनतेस मौजे खडकत ता.आष्टी जि, बीड यांना जाहीर केले जाते की अर्जदार नामे रतनबाई अशोक मोरे रा खडकत ता. आष्टी जि. बीड यांनी त्यांचे नामे, पार्वती नारायण जंजीरे रा खडकत ता. आष्टी जि.बीड याची जन्म/मृत्यू दि. ०४/०१/२०१६ रोजी मौजे. खडकत ता. आष्टी जि.बीड येथे झाला असुन अर्जदारास सदरहू जन्म/मृत्यूची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणून या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करीता सदरहू अर्जदारावे यांची आई यांचे कायदेशीर जन्म/मृत्यू दिनांक कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिद्धी तारखेपासून १५ दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते कि, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहू जन्म/मृत्यू नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०२/०६/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला.

आदेशावरून
स्वाक्षरीत /-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार आष्टी

## एसटी सुरक्षा दक्षता व उपप्रादेशिक परिवहन विभागाची अवैध प्रवाशी वाहनावर कारवाई

मंठा। प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या उत्पन्नावर अवैध प्रवाशी वाहतुकीचा मोठा परिणाम होत असून उत्पन्न वाढीसाठी एस.टी. स्थानकापासून २०० मीटरपर्यंत नो पार्किंग झोनची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. मंठा बसस्थानकातील नो पार्किंग झोन मधील वाहनांवर पथकाकडून कारवाई करण्यात आली. जिल्ह्यात दिनांक ५ जून पासून धडक कारवाई मोहीम सुरु झाली आहे. राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांनी विविध बैठकामध्ये अवैध प्रवाशी वाहतुकीमुळे एसटीच्या महसुलात घट होत असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी तथा पोलिस उपमहानिरीक्षक डॉ. प्रियंका नारनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व विभागांना विशेष मोहिम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

या मोहिमेअंतर्गत बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतुक करणा-या वाहनांवर लक्ष ठेवले जात असून



नियमभंग करणा-या वाहनांच्या विरोधात उपप्रादेशिक परिवहन विभाग व स्थानिक पोलिस यांच्या मदतीने कारवाई केली जाणार आहे. जालना विभागातील सर्व अधिकारी, पर्यवेक्षकीय कर्मचारी, आगार प्रशासन तसेच उपप्रादेशिक परिवहन विभाग व स्थानिक पोलिसांचे सहकार्य घेऊन अवैध वाहतुकीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. जालना विभागातील जालना मध्यवर्ती बसस्थानकासह अंबड, जाफ्राबाद, परतूर, बदनापूर, राजूर, घनसावंगी, कुंभारपिंपळगाव, शहागड, तीर्थपूरी, भोकरदन, आष्टी, मंठा व इतर सर्व प्रमुख बसस्थानकाच्या परिसरातही मोहिम राबविण्यात येत असून बसस्थानकाच्या बाहेरुन अनधिकृतपणे प्रवाशी वाहतूक करणा-या वाहनावर धडक कारवाई सुरू आहे. सर्व प्रवाशांनी एस.टी. बसनेच प्रवास करावा असे आवाहन करण्यात आले आहे. राज्य परिवहन महामंडळाचे सुरक्षा व दक्षता अधिकारी रवींद्र जाधव, सज्जनसिंग जारवाल, जिल्हा वाहतूक शाखेचे आर. जी. चव्हाण, डी. ए. जाधव, चालक व्ही. जी. चव्हाण यांनी नो पार्किंग झोन मधील वाहनांवर कारवाई केली.

# महसूल मंत्र्यांच्या आदेशानंतर बीडचा महसूल विभाग सक्रिय

## वाळू प्रकरणात तहसीलदार खोमणे यांची आज सुनावणी दोन दिवसात दोषी अधिकारी कर्मचाऱ्यावर होणार कारवाई

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गोदावरी नदीतून मोठ्या प्रमाणात होणारा अवैधरित्या वाळू उपसा आणि यासाठी तहसीलदार खोमणे आणि संबंधित कर्मचाऱ्यांचा असलेला वरदहस्त या बाबी आता चव्हाट्यावर आल्या असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनीही या संदर्भात महसूल मंत्र्यांकडे तक्रार केलेली आहे. अंबडचे तहसीलदार चव्हाण यांच्यावर लाच घेतांना झालेली कारवाई. यामुळे आता हे सर्वच प्रश्न चव्हाट्यावर आले असून गोदावरी नदीतून होणारा मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा. याप्रकरणी आता महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी आदेशित केल्यानंतर बीड जिल्हा अधिकारी सक्रिय झाले असून त्यांनी तात्काळ नोटीस बजावत आज जिल्हाधिकारी कार्यालयात तहसीलदार खोमणे आणि इतरांची सुनावणी ठेवली आहे. या संदर्भात दिलेल्या नोटिसांमध्ये समाधानकारक उत्तर देता आले नाही तर निलंबनाची कारवाई होणार अशी जोरदार चर्चा चालू आहे. दरम्यान गेवराई तालुक्यातील ७४३ घरकुल लाभार्थ्यांना कागदोपत्रीच वाळू दिली गेली असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. याच्या चौकशीच्या अहवालानंतर संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई अटळ आहे.



### तहसीलदार खोमणे यांची आज सुनावणी

दरम्यान या प्रकरणातील प्रमुख असलेले गेवराईचे तहसीलदार खोमणे महसूल विभागाचे मंडळ अधिकारी तलाठी आणि ग्रामसेवक यांच्यावरही कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून या प्रकरणात आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये तहसीलदार खोमणे यांची सुनावणी घेण्यात येणार आहे. तहसीलदार खोमणे दोषी आढळले तर त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई होईल असेही बोलले जात आहे.

गेल्या काही दिवसापासून बीड जिल्ह्यातील गेवराई तालुका आणि जालना जिल्ह्यातील अंबड तालुका या परिसरामधून मोठ्या प्रमाणात निविदा झालेली नसतानाही मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या आशीर्वादाने वाळूमाफिया करत असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास वाळू शासनाकडून दिली जाणार आहे. ही वाळूही कागदोपत्री दिली गेल्याचे दाखवून जवळपास ७४३ लाभार्थ्यांना वाळूच दिली गेली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. ही सर्व वाळू माफियांच्या घशात घातल्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी पथके नेमून या प्रकरणाची चौकशी केली. या चौकशीमध्ये गेवराईचे तहसीलदार खोमणे आणि त्यांचे सहकारी संबंधित विभागाचे मंडळ अधिकारी तलाठी आणि ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करावी असा अहवाल महसूल विभागातर्फे नेमण्यात आलेल्या समितीने दिला असून आज तहसीलदार खोमणे यांची जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली आहे. हा सर्व प्रकार महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आल्यानंतर आणि या प्रकरणात गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी तक्रार केल्यानंतर ना. बावनकुळे यांनी बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांना आदेशित करून या प्रकरणातील दोषीवर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यानंतरच आता जिल्हा अधिकारी या प्रकरणात सक्रिय झाले असून त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालया मध्ये तहसीलदार खोमणे यांची सुनावणी ठेवली आहे. या सुनावणी नंतर काय कारवाई होते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तहसीलदार खोमणे व महसूल विभागातील यंत्रणेलाही नोटीसा देण्यात आल्या असून दोन दिवसात समाधानकारक उत्तर न आल्यास त्यांच्यावर कारवाई अटळ आहे. या प्रकरणांमध्ये घरकुल लाभार्थ्यांना वाळू मिळाली नसल्याचे आता स्पष्ट झाले असून केवळ कागदपत्री वाळू मिळाल्याचे दाखवून ही सर्व वाळू वाळू माफियांच्या घशात घातली आहे. त्यामुळे या प्रकरणात कारवाई अटळ असून गेल्या अनेक वर्षापासून महसूल यंत्रणा आणि पोलिस यंत्रणेच्या आशीर्वादाने चालू असलेला अवैध वाळू उपसा या प्रकरणामुळे थांबणार आहे.

दरम्यान तहसीलदार खोमणे यांना एका मंत्र्यांचा आशीर्वाद असल्याचे बोलले जात आहे. तसेच तहसिलदार खोमणे यांना गेवराईतून तात्काळ हटवावे अशी सर्वसामान्य नागरिकांची मागणी असून या यंत्रणेतील सर्वच दोषींवर कठोर कारवाई झाली तरच हा वाळू माफियांचा नंगानाच थांबेल अशी प्रतिक्रिया गोदाकाठच्या गावातील नागरिक देत आहेत. महसूल विभागात उघडपणे चालू असलेला हा नंगानाच थांबला नाही तर नागरिकच आता गावागावांमध्ये तीव्र आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी कठोर भूमिका घेतली तर तहसीलदार खोमणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना घरचा रस्ता दाखवला जाईल हे आता स्पष्ट होत आहे.

### ना. बावनकुळे यांचे स्पष्ट आदेश

या प्रकरणाची माहिती महसूल मंत्री नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतर त्यांनी या प्रकरणात कोणाचीही गय करू नका असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले असल्याची खात्रीलायक माहिती असून आता जिल्हाधिकारी या प्रकरणांमध्ये कठोर भूमिका घेतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### आ. पंडित यांनी केली होती तक्रार

या वाळू माफियांच्या नंगानाचा नंतर प्रशासन यात सहभागी असल्याचे स्पष्ट होत असून घरकुल लाभार्थ्यांना दिली जाणारी पाच ब्रास वाळू ही जवळपास ७४३ लाभार्थ्यांना दिलीच नाही. मात्र कागदोपत्री ती दिल्याचे दाखवण्यात आले आहे. या प्रकरणी तक्रार झाल्यानंतर बावनकुळे यांनी या प्रकरणात लक्ष घालून आता या प्रकरणाची चौकशी गंभीर वळणावर पोहोचली आहे. यातील दोषींवर कारवाई होणारच असे आता स्पष्ट होत आहे.

# आर्थिक व्यवहारातून लिपिकाला आठ तास डांबून ठेवत मारहाण

परळी । प्रतिनिधी

बीडच्या परळीत एका लिपिकाला आर्थिक व्यवहारातून निर्जन स्थळी नेत तिघांकडून आठ तास डांबून ठेवत बेल्ट – काठीने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

एका महाविद्यालयात लिपिक पदावर कार्यरत असलेले अनिल पत्की आणि आरोपी वैजनाथ यादव यांच्यात आर्थिक व्यवहार झाला. या व्यवहारापोटी पत्की यांनी यादव यांना १ लाख रुपये परत केले असे असतानाही यादव यांनी आणखी चार लाख रुपयांसाठी तगादा लावला.त्यानंतर यादव यांनी थेट लिपिकाचे घर गाठून त्यांना गाडीवर बसवत धारावती तांडा परिसरातील निर्जन स्थळी एका झाडाखाली नेले. याच ठिकाणी त्याच्यासह त्याच्या दोन साथीदारांनी बेल्ट आणि लाकडाच्या साह्याने बेदम मारहाण केली.यावरच ते थांबले नाहीत तर लिपिकाला पोलिसांकडे गेला तर जीवे मारण्याची धमकी ही दिली. सकाळी साडेदहा ते सायंकाळी साडेसहा दरम्यान केलेल्या मारहाणी नंतर लिपिकाला आरोपीच्या दुकानासमोर सोडून त्यांचा मोबाईल देखील घेतल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

लिपीक असलेले पत्की यांना केलेली ही मारहाण इतकी भीषण होती की त्यांच्या पाठीवर आणि शरीरावर सर्वत्र व्रण उमटले. या मारहाणीमुळे पत्की यांच्या मनात दहशत निर्माण झाली असून त्यांनी माध्यमांसमोर बोलण्यास नकार दिलाय.या प्रकरणी अनिल पत्की यांच्या फिर्यादीवरून वैजनाथ यादव आणि त्याचे दोन अज्ञात साथीदारा विरोधात परळी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा अधिकचा तपास पोलीस करत आहेत. धमकी देऊन जवळपास आठ तास डांबलं जर आरडाओरडा केला किंवा पोलिसांत ◀◀ पान ३ वर

# कृषी दुकानात पाणी शिरले; २० ते २५ लाखाचे नुकसान झाले

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरासह परिसरात वरूण राजाने जोरदार हजेरी लावली. यात शेतकरी राजा सुखावला असून खते,बी बियाणे खरेदी करण्यासाठी बाजारात दाखल झाले असून कृषी दुकानाच्या समोर शेतकऱ्यांनी एकच गर्दी केल्याचे चित्र पहावयास मिळाले आहे. तर रात्री झालेल्या पावसामुळे चिंचवण रोडवरील एका कृषी दुकानात पाणी शिरल्याने २० ते २५ लाखाचे नुकसान झाले असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.पावसामुळे चिंचवण रोडवरील लांडे बंधू यांच्या मालकीच्या शेतकरी कृषी दुकानात पाणी शिरले आहे. दुकाना समोरील नाली तुंबल्याने नालीतले व पावसाचे पाणी सदरील दुकानात शिरले असून यामध्ये सोयाबीन, खत, कापसाच्या बॅगा औषधे व इतर बियाणे सह जवळपास एकूण लाखो चे नुकसान झाले असल्याची माहिती दुकानाचे मालक रवी लांडे यांनी दिली आहे. तर सदरील प्रकरणाचा पचनामा करून सदरील कृषी दुकानदाराला योग्य आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी. अशी मागणी होऊ लागली आहे.



# अवैध वाळु वाहतुक बनावट रॉयल्टी दाखवणाऱ्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

केसापुरी वसाहत येथील सादोळा चौक,माजलगाव येथे दि १० जून रोजी सकाळी ०७:२५ वाजण्याच्या सुमारास एक वाळु वाहतुक करीत असलेला हायवा टिप्पर क्रमांक एम. एच.१६,सी.ई. ७६९९ याचे टायर फुटुल्याचे सदर हायवा रोडच्या बाजुस थांबलेला माजलगाव शहर पोलीसांना मिळुन आला.सदर हायवा दुभाजकाला धडकल्याने दुभाजकाचे नुकसान झाल्याचे दिसुन आले.सदर हायवा मालक नामे माणिक शेषेराव जाधव रा. चिंचगव्हाण ता. माजलगाव याने पोलीसांना सदर हायवामध्ये चांगतपुरी जि. जालना येथील टेंडरवरुन वाळु आणल्याचे



सांगुन तेथील रॉयल्टी पोलीसांसमक्ष हजर केली. पोलीसांनी तपासाची चक्रे फिरवले असता सदरची रॉयल्टी बनावट असल्याचे निष्पन्न करुन हायवा मालकास अधिक विचारपुस करता त्याने सदर हायवामध्ये हिवरा नदीपात्रामधुन हायवा चालकाने भरुन आनल्याचे सांगीतल्याने माजलगाव शहर पोलीसांनी सदर हायवामध्ये मिळुन आलेली वाळु व हायवा असा एकुण किंमती २०,१२,०००/- रुपयेचा मुद्देमाल जप्त करुन सदर आरोपी माणिक शेषेराव जाधव व हायवाचा चालक यांचेविरुध्द पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे कलम ३०३(२), ३१८(४), ३३८, ३३६(४), ३४०(२),३(५) भारतीय न्याय संहिता सह कलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल केला असुन हायवा मालक आरोपी नामे माणिक शेषेराव जाधव यास पोलीसांनी अटक केले ◀◀ पान ३ वर

# शेतकरी कर्ज माफीच्या जीआरची होळी करणार : भाई तावरे

## जिल्ह्यात प्रति हेक्टर १७,५०० रुपये पीकविमा देण्याचीही मागणी; १२ जून रोजी मोठेवाडीत रॅली

माजलगाव । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयाविरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, या निर्णयाची गावातून रॅली काढून होळी करण्यात येणार असल्याची घोषणा शेतकरी नेते भाई गंगा भीषण थावरे यांनी केली आहे. तसेच मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आश्वासनानुसार बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपये पीकविमा सरसकट देण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.



शासनाने नुकत्याच जारी केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या शासन निर्णयात यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना नव्या योजनेतून वगळण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. भाई गंगा भीषण थावरे म्हणाले की, निवडणुकांपूर्वी शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेप्रमाणेच शेतकऱ्यांनाही दिलासा मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्षात जाहीर झालेली कर्जमाफी योजना ही शेतकऱ्यांच्या अपेक्षाभंग करणारी असून अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहणार आहेत. त्यामुळे ही योजना शेतकऱ्यांच्या हातात गाजर दाखविणारी ◀◀ पान ३ वर

# वडिलांच्या मित्राकडूनच मुलीवर ४ महिने लैंगिक अत्याचार

### माजी सरपंचा विरुद्ध गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात माणुसकीला काळिमा फासणारी घटना समोर आली आहे. वडिलांचाच मित्र असलेल्या माजी सरपंच नवनाथ आयंदे याने अल्पवयीन मुलीवर चार महिन्यांपासून लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पीडितेला दिवस गेल्याने हे प्रकरण समोर आले. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी नवनाथ आयंदे आणि पीडितेचे वडील मित्र आहेत. त्यामुळे आरोपीचे पीडितेच्या घरी व शेतात सतत येणे-जाणे होते. पीडित तरुणी १२ वी झालेली असून वडिलांना शेतीकामात मदत करत होती. साधारण चार महिन्यांपूर्वी पीडिता शेतात केळीला पाणी देत असताना आरोपीने तिच्या शेतात येऊन पैशाचे आमिष दाखवले व जबरदस्तीने अत्याचार केला. नकार देऊनही आरोपीने वारंवार अत्याचार केल्याने पीडितेच्या पोटात दुखू लागले. वडील व मावस भावाने तिला माजलगाव येथील खासगी दवाखान्यात नेले. सोनोग्राफीत ती चार महिन्यांची गर्भवती असल्याचे स्पष्ट झाले. डॉक्टरांनी तिला तात्काळ सरकारी दवाखान्यात पाठवले. वडिलांनी विश्वासात घेऊन विचारपूस केली असता पीडितेने नवनाथ आयंदे याने जबरदस्ती केल्याचे सांगितले. या प्रकरणी प्रथम माजलगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवून तो पुढील तपासासाठी आष्टी पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

# समाधान खिंडकर यास मारहाण दादा खिंडकरवर गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

परस्पर विरोधी गुन्हे दाखल प्रकरणात चर्चेत आलेल्या समाधान खिंडकर याला दिनांक १० जून बुधवार रोजी सायंकाळी पंचायत समिती परिसरामध्ये त्याचाच भाऊ दादा खिंडकर यांनी मारहाण केल्याची तक्रार शिवाजीनगर पोलीस ठाण्यात देण्यात आली असून याप्रकरणी दादा खिंडकरच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी पाली परिसरात असलेल्या एका हॉटेलमध्ये मारहाण झाल्याची तक्रार करण्यात आली होती. या परस्परविरोधी तक्रारी खोट्या असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्यानंतर त्या रद्दबातल ठरवण्यात आल्या. या प्रकरणातील तक्रारदार समाधान खिंडकर याला बुधवारी सायंकाळी पाचच्या सुमारास पंचायत समिती परिसरामध्ये त्याचाच भाऊ दादा खिंडकर यांनी शिवीगाळ करून मारहाण केल्याची तक्रार समाधान दिनकर यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दिल्यावरून याप्रकरणी दादा खिंडार याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पुरुषोत्तमपुरीत महाप्रसादाचे आयोजन; भाविकांनी लाभ घ्यावा -श्रीहरी नाना मोरे

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील श्री. क्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे पवित्र अधिक मासानिमित्त भगवान पुरुषोत्तमाला नैवेद्य अर्पण करून भाविकांसाठी गेल्या तीस वर्षापासून या महाप्रसादाचे आयोजन श्रीहरी मोरे यांच्या वतीने केले जाते. हा धार्मिक सोहळा दि. १२ जून २०२६ रोजी सकाळी ०७ वाजल्यापासून आपले अगमनापर्यंत आयोजित करण्यात आला असून, परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादाचे यजमान श्रीहरी नाना मोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.



अधिक मास या पावन महिन्यात भगवान विष्णूच्या पुरुषोत्तम स्वरूपाची विशेष पूजा-अर्चा केली जाते. पुरुषोत्तमपुरी येथील प्राचीन आणि जागृत देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भगवान पुरुषोत्तम मंदिरात दर अधिक मासात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, भजन-कीर्तन आणि महाप्रसादाचे आयोजन केले जाते. यंदाही अधिक मासानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महाप्रसाद सोहळ्यात भाविकांना महाप्रसादाचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे पुढाकारातून करण्यात आले आहे. भगवान पुरुषोत्तमाच्या कृपेचा लाभ घेण्यासाठी तसेच धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव घेण्यासाठी भाविकांनी या महाप्रसाद सोहळ्यास उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीहरी मोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे.


# कर्करोग औषधांच्या किंमतीत दरवाढ करू नये - डॉ.इंगोले

## दरवाढी विरोधात रूग्ण संघटनांकडून तीव्र निषेध

अंबाजोगाई । प्रतिनिधी

देशातील कर्करोग रूग्णांसाठी जीवदायी असलेल्या केमोथेरपी औषधांच्या किंमती केंद्र सरकारने जनतेच्या, रूग्णहिताला डावलून वाढविल्याच्या निर्णयाविरोधात रूग्ण संघटना, डॉक्टर आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध नोंदवला आहे. केंद्र सरकारने कच्च्या मालाच्या वाढत्या किंमती आणि उत्पादन खर्चाचे कारण देत प्लॅटिनम - आधारित सिस्प्लॅटिन आणि कार्बोप्लॅटिन यांसह एकूण ४ कर्करोग औषधांच्या दरवाढीस मंजुरी दिली आहे. फुफ्फुस, अंडाशय, गर्भाशय, डोके-मान, मूत्राशय आणि पचनसंस्थेच्या कर्करोगाच्या उपचारात ही औषधे अत्यावश्यक मानली जातात.

इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी आधीच देशभर या जीवदायी औषधांचा तुटवडा आहे असे सांगून अनेक रूग्णालयांनी उपचारांचे वेळापत्रक बदलून औषधांचे रेशनिंग सुरू केले आहे असे म्हटले आहे. अशा स्थितीत दरवाढीचा निर्णय म्हणजे गरिबांच्या जीवाशी खेळ आहे. कर्करोग हा आधीच लाखो रूपये खर्च करणारा आजार आहे. दरवाढीमुळे अनेक रूग्ण उपचार परवडत नसल्याने अर्धवट सोडतील. त्यामुळे सरकारने ही दरवाढ अजिबात करू नये असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. औषध उत्पादक कंपन्यांनी ८२ औषधांच्या दरवाढीची मागणी केली होती. मात्र सरकारने केवळ ४ औषधांना मंजुरी दिली असली, तरी रूग्ण संघटनांचे म्हणणे आहे की ही सुरूवात आहे आणि पुढे आणखी दरवाढ होण्याची शक्यता आहे. या निर्णयामुळे रूग्णालयांवर अतिरिक्त भार पडला आहे. आधीच तुटवड्यामुळे रूग्णांना पर्यायी उपचार देण्याची वेळ अनेक रूग्णालयांवर आली आहे. दरवाढ झाल्याने रूग्णांवर आर्थिक भार वाढेल आणि सरकारी योजनांवरही अतिरिक्त ताण येईल. ही दरवाढ मानवीय दृष्टिकोनातून अयोग्य आहे असेही डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. पुढे डॉ.राजेश इंगोले यांनी कर्करोग हा रूग्ण आणी त्याच्या परिवारावर आलेले संकट असते यावर सरकारने सहानुभूती पूर्वक विचार करायचे सोडून सरकारने स्वीकारलेले दरवाढीचे धोरण धोकादायक आहे. जर दरवाढ मागे घेतली नाही, तर रूग्ण संघटना व डॉक्टरांच्या संघटनाद्वारे देशभर याविरूद्ध आंदोलन छेडले जाईल अशी माहिती डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिली. केंद्र सरकारने ही जीवदायी औषधीची दरवाढ करतांना दावा केला आहे की, तुट भरून काढण्यासाठी आणि उत्पादन सुरळीत राहावे यासाठी मर्यादित दरवाढ आवश्यक होती. मात्र रूग्णांच्या जीवाशी संबंधित बाबतीत हा तडजोडीचा हा मार्ग मान्य नाही, आणि हा तुघलकी निर्णय कॅन्सर रूग्णांच्या मूलभूत आरोग्य अधिकाराशी विसंगत अशी दरवाढ आहे असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26